# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ४ ऑगस्ट २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक -१०

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 04 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-10 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


## लक्ष्यवेधी

# हे असे आणखी किती वर्षे चालणार ?

आधुनिक केसरी

चंद्रपूरला पुराचा वेढा, चंद्रपुरात आला पूर, अनेक वस्त्यांमध्ये शिरले पाणी, नागरिकांच्या घरात पुराचे पाणी... या आणि अशाच प्रकारच्या



शाम हेडाऊ 9834301568

हेडलाईन्स आपण गेले आठ दिवस झालेत वाचतोय. पण, पण या हेडलाईन्सच मुळात चुकीच्या आहेत. बेसिकली चंद्रपूरला पूर आलाच नाही आणि नागरिकांच्या घरात पाणी शिरलं नाही. नागरिक थेट नदीच्या पात्रात गेले. तिथे त्यांनी आधी झोपड्या बांधल्या, मग हळूहळू करत झोपड्यांची घरं झाली, नंतर गेल्या दहा बारा वर्षांत नदीपात्रात प्लॉट पाडून विकण्याचा गोरखधंदा सुरू झाला. मग हळूहळू बिल्डर लॉबीने याच नदीपात्रात मोठमोठ्या सदनिका (फ्लॅट स्किम) उभ्या केल्या. आत्ता आत्ता अगदी कोरोना काळात पठाणपुरा गेटच्या बाहेर जगन्नाथ मठाच्या रोडवरसुद्धा थेट नदीपात्रात प्लॉट पाडून आताही विक्री सुरू आहे. यामुळेच मग नदीचे पात्रच घरांमधे परावर्तित झाले आणि लोक म्हणतात घरात पाणी शिरले.

मला काही प्रश्न पडलेत ते असे की, नदी म्हटलं की ब्ल्यू लाईन, रेड लाईन, पूरप्रवण क्षेत्र हे सगळं आलंच. तर चंद्रपुरात असे काही ब्ल्यू लाईन, रेड लाईन, पूरप्रवण क्षेत्र आहे का ? असल्यास या भागाचे काही नियम इथे लागू होतात का ? त्यावर काही अंमलबजावणी केली जाते का ? नदीपात्रात प्लॉट पाडून विक्रीला परवानगी कशी मिळते ? बिल्डर लॉबीचे सदनिकांचे (अपार्टमेंट, फ्लॅट स्किम) चे नकाशे कसे सँक्शन होतात ? गेल्या पाच सात वर्षांत शहराच्या आजूबाजूला असलेल्या क्षेत्रात नदीच्या पात्रातील घरात अचानक कशी काय वाढ झालीय ? बरं ज्यांच्या या झोपड्या/घरे आहेत तेच लोक तिथे राहतात का की त्यात भाडेकरू राहतात ? हे लोक कुठून आलेत ? यांची नोंद महापालिका/ जिल्हा प्रशासन/ पोलीस विभागाकडे आहे का ? महानगरपालिका/ जिल्हा प्रशासनाकडे चंद्रपूर शहर विकासाच्या दृष्टिकोनातून पुढील 20/25 वर्षांच्या अनुषंगाने काही नियोजन केलेले आहे का ? त्याची काही अंमलबजावणी होत आहे का ?

खरं सांगायचं तर चंद्रपूरला आता गो. रा. खैरनार, तुकाराम मुंढे, अब्दुल रहमान यांच्यासारख्या प्रामाणिक, कार्यक्षम अधिकाऱ्यांची गरज आहे. तर आणि तरच चंद्रपूरचं काही भलं होऊ शकतं. किंवा मग कोणताही राजकीय पक्षविरहित असा केवळ चंद्रपूरकरांचा एक प्रामाणिक दबाव गट निर्माण होणे आवश्यक आहे. जो फक्त शहर विकासाच्या दृष्टिकोनातून विचार करेल आणि प्रत्यक्ष काम करेल.

कोणताही राजकीय नेता या विषयाला हात लावणार नाही. कारण त्यांना शहर विकासापेक्षा तेथील व्होट बँक महत्त्वाची वाटते. पूर आला. शासनाचे पैसे वाटून दिले की यांचं काम संपतं. मतं पक्की होतात. मग पुन्हा पुढील वर्षी पूर आला की हे पुन्हा मदत मागायला तयार.

सर्व करदाते हे कर यासाठी देतात की रस्ते, नाल्या, स्ट्रीट लाईट, पूल, वाहतूक व दळणवळणाच्या सोई, आरोग्य आणि शिक्षण हे योग्य मिळावे. पण जर या पैशाचा वापर हे चुकीच्या पद्धतीने नदीपात्रात घर बांधून राहणाऱ्या नागरिकांना वाटण्यात, उधळण्यात होत असेल तर आता हे धंदे बंद व्हायला हवेत कायमचे! संपूर्ण जिल्हा प्रशासन, महानगरपालिका, पोलीस विभाग या लोकांसाठी झटतात जे चुकीची कामं करतात. यांच्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन राबवा, यांना राहण्याची, जेवणाखाण्याची, आरोग्य तपासणीची सगळी व्यवस्था करा. दर दोन चार वर्षांत पूर आला की हेच सगळं सातत्याने होत चाललंय. हे असंच आणखीन किती वर्षं चालणार ?

एक चांगला प्रामाणिक दबावगट तयार करणे, यातून प्रशासनावर अंकुश आणणे आणि ही अशी चुकीची कामे बंद करून शहर विकासाच्या दृष्टिकोनातून प्रामाणिक प्रयत्न करणे खूप आवश्यक आहे. नदीपात्राची स्वच्छता आणि खोलीकरण हा स्वतंत्र मुद्दा घेऊन त्यावर नीट काम करणे हे आताच खूप आवश्यक आहे. अन्यथा येणारी पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही. यावर सखोल चिंतन व्हावे, विचारविमर्श व्हावा आणि यातून काहीतरी चांगल निघावं जे समस्त चंद्रपूरकरांसाठी चांगलं राहील यास्तव केलेला हा लेखनप्रपंच.



# दूर गेले कवितेचे धनी...

## निसर्गकवी ना. धों. महानोर कालवश



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे- "आज उदास उदास दूर पांगल्या साउल्या, एकान्ताच्या पारावर हिरमुसल्या डहाळ्या..." सृष्टीसौंदर्याला नव्या प्रतिमांचा साज देतानाच विरहिणीचीही अशी व्यथा मांडणारे निसर्गकवी ना. धों. महानोर यांच्या निधनाने अस्सल मराठी कवितेचा धनी दूरच्या प्रवासाला निघून गेला आहे.**

**ना . धो . खूपच हळवे :** 'माझे जवळचे मित्र आणि महाराष्ट्राचा रानकवी ना . धों . महानोर यांच्या निधनाने मला अतिशय दु :ख झाले आहे . औरंगाबाद जिल्ह्यातील पळसखेड खेड्यात गरीब शेतकरी कुटूंबात जन्मलेल्या ना . धों . चे बालपण कष्टात गेले पण कष्ट झेलताना त्यांचे संवेदनशील मन रानात रमले . तिथेच त्यांच्या सर्जनशीलतेला धुमारे फुटले . ना .धो . च्या कवितांनी रानातल्या कविता, पावसाळी कवितांनी , जैत रे जैत सारख्या अनेक चित्रपट गीतांनी मराठी माणसांच्या मनावर गारूड केले . ना . धों ची विधान परिषदेतील भाषणे देखील माणसाच्या काळजाचा ठाव घेत . ना . धो . खूपच हळवे , त्यात पत्नीच्या निधनाने ते आणखी खचले . मी , प्रतिभा त्यांच्या खचलेल्या मनाला उभारी देत राहिलो . पण अखेर हा वृक्ष उन्मळून पडला . ना . धो . चे निधन देखील पावसाळ्याच्या दिवसांत व्हावा हा योग मनाला चटका लाऊन जाणारा आहे . मी आणि माझ्या कुटूंबांतर्फे या मृदू मनाच्या निसर्ग कवीला श्रद्धांजली अर्पण करतो', असे म्हणत राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आपल्या मित्राच्या जाण्याचे दु :ख व्यक्त केले .

**महानोर यांना मिळालेले पुरस्कार :** साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानासाठी महानोर यांना आजवर अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले . त्यांना 1991 साली भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार, 2015 साली जागतिक चित्रपट महोत्सव गीतकार जीवन गौरव पुरस्कार, कृषीभूषण (महाराष्ट्र शासन) 1985, 'वनश्री' पाणलोट पर्यावरण क्षेत्रातील कार्याबद्दल . 1991, 'कृषिरत्न' शेती क्षेत्रातील बहुमोल कामगिरीबद्दल सुवर्णपदक 2004, डॉ . पंजाबराव देशमुख गौरव पुरस्कार 2004, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार, 2009 साहित्य अकादमी पुरस्कार, 2000 'पानझड', विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (महाराष्ट्र शासन) आणि 'मराठवाडा भूषण' अशा पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले होते .

**प्रतिभावंत कवी मराठी साहित्य विश्वाने गमावला :** अतिशय दुखद आणि धक्कादायक बातमी आहे . ज्या कवीचे प्राण रानामध्ये गुंतले होते, असा मोठा निसर्गकवी मराठी साहित्यविश्वाने गमावला आहे . शेती आणि कविता हे दुर्मिळ नातं असतं, ज्या कवीने आयुष्यभर शेतात राबून त्या रानाचीच कविता लिहिली असा कवी महानोरांच्या रुपाने गमावला आहे . त्यांची शेवटची भेट उस्मानाबादच्या साहित्य संमेलनात झाली होती . त्यांच्या प्रकृतीविषयीच्या बातम्या कानावर येत होत्या . माणूस म्हणून ना धों महानोर मोठे होते . विधानपरिषदेत असताना त्यांनी केवळ साहित्याचे प्रश्न मांडले नाही तर समाज आणि विशेषत : शेतीचे प्रश्न देखील मांडले . समाजभान असलेला, ग्रामीण संस्कृतीशी एकरुप झालेला, साहित्य व्यवहाराकडे सकारात्मकदृष्टीने पाहणारा प्रतिभावंत कवी मराठी साहित्य विश्वाने गमावला अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी दिली .

प्रसिद्ध निसर्गकवी ना. धों. महानोर यांचे निधन झालं आहे. पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात आज (3 ऑगस्ट )सकाळी साडे आठच्या वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. वयाच्या 81 व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. उद्या पळसखेड या त्यांच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने अवघ्या साहित्यविश्वावर शोककळा पसरली आहे.

गेल्या पाच सहा महिन्यांपासून ते सातत्याने आजारी होते. तर हृदयविकाराच्या त्रासामुळे त्यांना 20 दिवसांपूर्वी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरु होते, परंतु त्यांच्याकडून प्रतिसाद मिळत नव्हतं. गेल्या काही दिवसांपासून ते व्हेंटिलेटरवर होते. अखेर आज त्यांनी प्राण सोडले.

ना धों महानोर यांचा जन्म औरंगाबाद जिल्ह्यातील पळसखेड या गावी झाला होता. त्यांचे शालेय शिक्षण पळसखेड, पिंपळगाव, शेंदुर्णी इथे झालं. त्यानंतर जळगावातील महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला; मात्र त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पहिल्या वर्षापर्यंतच झालं. महाविद्यालयीन शिक्षण सोडून शेती करायला ते आपल्या गावी परतले. मराठी साहित्यविश्वात ते 'रानकवी' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवितांवर बालकवींचा प्रभाव जाणवतो. ना.धों. महानोर यांनी 'पानझड', 'तिची कहाणी', 'रानातल्या कविता' गाण्यांमधून पळसखेडची मराठवाडी लोकगीते प्रसिद्ध केली.

# जम्मू-कश्मीरमध्ये चार वर्षे होऊनसुद्धा निवडणूक का नाही ?

## भाजपचे आश्वासन केवळ निवडणूक जुमला : खासदार सुप्रिया सुळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दिल्लीमधील सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्या आणि पोस्टिंग संदर्भात केंद्र सरकारने लोकसभेत विधेयक मांडले. या विधेयकावर चर्चा करताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी भाजपावर निशाणा साधला आहे. भाजपाकडून कायमच आमच्यावर टीका करताना घराणेशाहीचा मुद्दा कायम पुढे केला जातो. मला ते मान्य आहे कारण मी स्वतः घराणेशाहीचे प्रॉडक्ट आहेच. मी प्रतिभा शरद पवार यांची मुलगी आहे याचा मला अभिमान आहे. पण मला भाजपाला एक प्रश्न विचारायचा आहे घराणेशाहीचा मुद्दा तुम्ही उपस्थित करता मग एनडीएची बैठक जेव्हा होते तेव्हा जी. के. वासन, चिराग पासवान, प्रफुल पटेल, दुष्यंत चौटाला हे सगळे असतात. हे सगळे घराणेशाहीचे मेरिट सांगणारे नाहीत का ? तुमच्या बरोबर असले तर मेरिट आम्ही जर बरोबर असलो तर घराणेशाही असे कसे काय चालेल ? असा प्रश्न खा. सुप्रियाताई सुळें यांनी भाजपला यावेळी विचारला आहे. सुप्रियाताई सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, भाजपा खासदारांची, आमदारांची पहिली, दुसरी आणि तिसरी पिढी राजकारणात झाली तरीही चालते. मात्र आम्ही केले तर ती घराणेशाही असते. माझ्या मतदार संघात जाऊन भाजपाच्या दिग्गज नेत्यांनी काय म्हटले होते ? राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी म्हणजे नॅचरली करप्ट पार्टी आहे.

# अजिंठा लेणी व्ह्यू पॉइंटवरील पर्यटक निवारा छत्रीकडे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज


**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी येथील व्ह्यू पाईंट वरून येणाऱ्या पर्यटकांकरीता उभारण्यात आलेल्या छत्रीच्या आकाराच्या तात्पुरत्या निवाऱ्याची प्रचंड दुरावस्था झाली असून देशभरातून येणाऱ्या पर्यटकांना या निवाऱ्याचा उपयोग व्हावा, यासाठी वन विभागाने याची दुरुस्ती तत्काळ हाती घ्यावी, अशी मागणी पर्यटकांनी केली आहे. जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी परदेशातून मोठ्या प्रमाणात पर्यटक अजिंठा लेणीला भेट देतात. शिवाय छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातून दररोज पर्यटकांची गर्दी अजिंठा लेणी पाहण्यासाठी असते. अनेक पर्यटक अजिंठा लेणीचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी व्ह्यू पाईंट व लेणापूर गावातून लेणीच्या वर असणाऱ्या धबधब्यांचा



आनंद घेत लेणीत उतरतात. या ठिकाणी पर्यटकांच्या तात्पोरा तात्पुरत्या निवान्यासाठी उभारण्यात आलेल्या छत्रीच्या आकाराच्या निवाऱ्याची वादळी वाऱ्याने या पत्रे उडाली आहेत, तर काही वाकली असून अनेक पत्रे जीर्ण झाली आहेत. या निवाऱ्यास एका बाजूने चक्क लाकडाच्या डीळीचा आधार देण्यात आलेला आहे. सध्या पावसाचे दिवस असल्याने व पर्यटकांना बसण्यासाठी जागा नाही. तर त्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे. याकडे अजिंठा वन विभागाने लक्ष देऊन दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी पर्यटकांच्या वतीने मागणी होत आहे.सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने व पावसामुळे डोंगरांमध्ये हिरवळ असल्याने नैसर्गिक वातावरण तयार झालेले आहे. अजिंठा लेणी पाण्यासाठी पर्यटकांची गर्दी दिवसे दिवस वाढत असल्याचे चित्र आहे. लेणी पाण्यासाठी आलेल्या पर्यटकांना धब धबा व निसर्ग रम्य वातावरणात सेल्फी घेण्याचा मोह आवरता येत नसल्याने पर्यटक लेणीवरील व्ह्यू पॉईंटला भेट देत निसर्गरम्य वातावरणाचा लाभ घेताना दिसतात. मात्र डोंगरावरील पायऱ्याने चढून वर गेल्यावर थकवा घालण्यासाठी या ठिकाणी उभारण्यात आलेल्या नीवाऱ्याचा आधार घेत असतात. उन्हाळ्यात व पावसाळ्यामध्ये मध्ये संरक्षनासाठी तिन्ही ऋतूमध्ये याचा उपयोग होतो. लेनापुर, सावरखेडा, या गावातील महिला, पुरुष ग्रामस्थ यांना बाहेरगावी जाताना अजिंठा लेणीतून जावी लागते. त्यांनाही पायी जाताना थकवा घालवण्यासाठी व उन्हापासून संरक्षण करण्यासाठी छत्रीचा उपयोग होत असतो. मात्र गेल्या काही वर्षापासून ही छत्री पत्रे उडाल्याने व जिर्न झाल्याने मोडकळीस आलेली आहे. सध्या पर्यटकांना पावसात उन्हात बसावे लागत आहे. पर्यटकांची गैरसोय होत आहे. अजिंठा वन विभागाच्या हद्दीत येत असल्याने लवकर छत्रीची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी पर्यटकांनी केली आहे.

अजिंठा लेणीच्या वरील बाजूस वन विभागाच्या हद्दीत येणाऱ्या या निवाऱ्याची उभारणी अनेक वर्षांपूर्वी झालेली आहे . पर्यटकांना थकवा घालविण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेल्या या निवाऱ्याच्या दुरावस्थेबाबत अनेक वेळा वरिष्ठ कार्यालयाला दुरुस्ती करण्यासाठी कळविण्यात आले आहे . वरिष्ठ कार्यालयाकडून या संदर्भात आदेश प्राप्त होताच दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल .





आधुनिक केसरी

'व्हय की. श्यामभाऊ आम्ही काही मोठा आजार असला तरच शहरात डॉक्टरकडे जातो. नाहीतर आम्हाला साधी गोळी बी म्हाईत नाय.'
मग सोपानकाका म्हणाले, 'चला रे मुलांनो. आमचं गाव दावतो तुम्हाला. तुमच्या शहरासारखं मोठं नाही बरं का ! बघा, आवडतं का तुम्हाला.'
श्यामराव म्हणाले, 'सोपान, अरे आम्ही पण येतो की. आपण सगळेच जाऊ.'
श्यामलाताई पण तयारच होत्या. सगळेच निघाले. गावात छोटी छोटी घरं होती. काही मातीची, काही सिमेंटची. काही घरे उंच अशा दगडी ओट्यावर होती. मुलांना मजा वाटत होती. गावाच्या एका कोपऱ्यात रामू लोहार राहत होता. एका उंच दगडी ओट्यावर त्याचे घर होते. मुले तिथे पोहोचली तेव्हा रामू कामच करीत होता. एका हाताने तिथे असलेला भाता खालीवर होत होता. त्याच्या हवेने भट्टीतील निखारे लालभडक फुलले होते. त्या भट्टीत त्याने काहीतरी लोखंडाची वस्तू ठेवली होती. ते सगळं पाहून मुलं काही काळ तिथं थबकली.
सोपानकाका म्हणाले, 'हे बघायचं का रे बाळांनो.'
पिंकी, राजेश दोघेही एकदम हो म्हणाले. शहरात त्यांना असं काही बघायला मिळत नव्हतं. पिंकीला आईने मघाशी लावलेलं गाणं आठवलं. ती म्हणाली, 'आई, आपण त्या गाण्यात पाहिलं, अगदी तसंच आहे ना इथे !' 'अगदी बरोबर आहे पिंकी. आता तू आणि राजेश बघा ते काका कसं काम करताहेत ते !' आई म्हणाली. रामुकाकांनी मग भट्टीतील ती वस्तू बाहेर काढली. ती तापून चांगलीच लाल झाली होती. रामुकाकांनी एका मोठ्या सांडशीत पकडून ती ऐरणीवर ठेवली आणि आपल्याजवळ असलेल्या मोठ्या लोखंडी घणाने ते त्यावर घाव घालू लागले. तसतसा त्या वस्तूला आकार यायला लागला. कोणीतरी आज आपल्याकडे आपलं काम बघायला आलं आहे याचा रामुकाकांना कोण आनंद झाला होता. 'पोरांनो, वाईच बसा की. समदं नीट बघा. हेच आमच्या रोजीरोटीच साधन,'' काका, तुम्ही काय बनवताय ?' राजेशनं विचारलं. 'पोरा, आता शेतीचा हंगाम सुरु व्हईल. मंग वावरात कामासाठी निंदणीसाठी, कंपनीसाठी विळे, खुरपं लागत्यात. त्येच मी बनवतो आहे आता. शेतीसाठी, बैलगाडीसाठी लागणाऱ्या वस्तू बी बनवतो म्या.बैल, घोडे यांच्या पायामंदी नाल ठोकावी लागते. त्ये बी बनवतो. घरात लागणारी विळी, खलबत्ता, अडकित्ता आणि काय काय समदं बनवतो म्यां. पण आता आमचा धंदा लई कमी झालाय. लोकं मोठ्या गावात जाऊन वस्तू घेत्यात.'



## समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

# अंतर्मनाची मुलभूत गरज विसरू नये

आधुनिक केसरी

अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते, कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अनेकदा आपले मन जुने सोडायला, विसरायला तयार नसते, तसेच ते नव्याची नवलाई देखील अनुभवू पाहत असते. खरे तर इथेच आपल्यातील निवड कौशल्याचे कसब दिसून येत असते. आपले अंतर्मन सौदर्याच्या संकल्पनांना नवी दिशा मिळवून देण्याच्या प्रयत्नात असते. नवे काहीतरी हवे असे म्हणणारे एक मन एका दिशेने, तर जुने ते सोने म्हणणारे दुसरे मन त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने विचार करत असते. असे जरी असले तरीही, प्रयोगशील मनाला नावीन्याची अनुभूति हवी असते, मग ते नव्याचाच अंगीकार करते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## दिंडी संसाराची | आनंदली ||

वेडावला जीव | संसारी सुखाला ||
मोहात गुंतला | अज्ञानी हा ||१||
मायेने ग्रासले | चिंतेने व्यापले ||
दंभाने गिळले | समाधान ||२||
थकल्या जीवाला | सापडेना वाट ||
आवघड घाट | संसाराचा ||३||
दूर क्षितिजात | वारी निनादली ||
आत्म्याची पाऊली | फेर धरी ||४||
सापडली खूण | अनंत जन्माची ||
दिंडी संसाराची | आनंदली ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

त्वां त्रिगुणात्मिकां देवीं भजान्यहं सदा सदा | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ५७ ||
मी तुला त्रिगुणात्मिक देवीला सदैव भजावे. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

बिना ज्ञान भक्ति करे, सो अन्धा जग जीव ।
भक्ति तत्त्व नहिं समझ है, क्यों कर पावे पीव ।।२५।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल तृतीय अध्याय)
०४/०३/२५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
संसारी जीव जे ज्ञानविहीन भक्ती करतात, ते सर्व अंधारात आहेत. त्यांना भक्ती काय पदार्थ आहे, याचा विवेक नाही, मग ते परमेश्वराला कसे प्राप्त करू शकतील ?



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## "पिंडी ते ब्रम्हांडी"

आधुनिक केसरी

याचा अभ्यास करत असताना आपल्या एक गोष्ट लक्षात येते मित्रांनो की या विश्वाचा विस्तार कसा झाला या बद्दल वेगवेळे विचार वेगवेगळ्या कल्पना मांडलेल्या दिसुन येतात.आपण मागच्या समासात काय अभ्यासले तर चार देह,चार अवस्था,चार स्थाने,चार अभिमान, चार गुण अशी एकुण बत्तीस तत्वे मिळून संपूर्ण पिंडब्रम्हांडाची रचना झाली आहे. आता एक गोष्ट लक्षात येते की वेगवेगळ्या विचार प्रवाहाचे लोक जेव्हां एकत्र येतात तेव्हा तुमच्या सा्रख्या विचारवंतांनी या भेदभावाला अशतःगुंडाळून समारज प्रबोधनाचे त्तव लक्षात घेऊन संतमहात्म्याचे विचार आमलात आणावे. देहपंचभूत्माक असतो. पंचभूते जड असतात. अशा जड पंचभूतांना चेतना देणारा आत्माचं असतो.तो देहातच असतो पण देहाहून वेगळा असतो. देह नाश पावतो,म्हणून देहाला आत्मा म्हणता येत नाही. या देहात पंचभूतांचा वास असतो. अंतःकरण,पंचप्राणदहा इंद्रिये याने सुक्ष्म देह बनतो. अंतःकरणपंचक मन, बुद्धि, चित्त, अहंकार व अंतकरण प्राणपंचक प्राण, अपान, व्यान, ऊदान व समान. विषयपंचक शब्द, स्पर्श रूप, रस, गंध पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेद्रिये, एकूण पंचवीस तत्वे, माणसाचे शरिर याचे बनलेले असते. स्थुल देहपंचभूत्माक आहे. सुक्ष्म देहाचा विचार केला तर अंतःकरण, मन, बुध्दि आत्म्याहून निराळी आहेत. माझे अंतःकरण,माझे मन,माझी बुद्धिअसे आपण म्हणतो.म्हणजे मी अंतःकरण मन व बुद्धि नव्हे,मी त्यापेक्षा निराळा आहे. अंतःकरण,मन या पंचभूतात्मक रूपाने निर्माण झालेल्या आहेत. आणि आत्मा या सगळ्या ऊपाधि आहेत.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# आपल्या 'मी'चे स्वरुप आनंदमय आहे

आधुनिक केसरी

इच्छित वस्तू मिळणे यात समाधान असतेच असे नाही. ती इच्छाच नाहीशी करणे यात समाधान आहे. हाव संपेल तेव्हाच समाधान होईल. याकरिता वासनाक्षय कशाने होईल ते पाहावे. कशात सुख आहे, कशाची कास धरावी, इकडे लक्ष द्यावे. खरा आनंद आणि समाधान भगवंताचे होण्यातच आहे. ‘ भगवंता, तुझ्यावाचून माझे कोणी नाही ’ हे ज्या दिवशी मनाने पक्के ठरेल, त्याच दिवशी समाधान मिळेल. जितकी विषयाची आवड धरावी, तितके दुःखच पदरात येते. विषयसुख न मागताही येते; परंतु जे परमार्थाच्या आड येणार आहे, ते मागत कशाला राहायचे ? माझ्या मागे राम आहे म्हटले, म्हणजे प्रपंचातल्या विषयात जरी राहिलो तरी भिण्याचे कारण नाही. भगवंताचा आधार कायम ठेवला की मग विषयांची नाही भीती वाटत. नेहमी अनुसंधानात राहिले म्हणजे मग ‘ सावधच ’ राहिल्यासारखे आहे. दिवाळी हा आनंदाचा दिवस असतो, पण दिवाळीचा दिवस हा इतर दिवसांसारखाच असतो. इतकेच नव्हे, तर आदल्या दिवसाची परिस्थिती, संकटे आणि अडचणी त्या दिवशीही कायम असतात. याचा अर्थ असा की, परिस्थितीत बदल होत नाही. दिवाळीचा दिवस, हा दिवस या नात्याने निराळा नाही. पण काल आपण जे केले, ते दिवाळीच्या दिवशी आपण करीत नाही, हाच मुख्य फरक होय. आपणच दिवाळीच्या दिवसाला आनंदाचा दिवस करतो. हे जर खरे, तर तसा तो आपण नेहमीच का करू नये ? आपल्याला नेहमीच दिवाळी असावी; आपण नेहमीच आनंदात असावे; आणि त्याकरिता आनंदमय अशा भगवंताचा आधार घ्यावा. आपण दिवाळीच्या सणाचा आधार घेऊन आनंदी-आनंद करतो. मग आनंद जो निर्माण करतो त्या भगवंताच्याच आश्रयाला नेहमी का न जावे ? भगवंताचा आनंद हा फार बलवत्तर आहे. तो एकदा मिळाल्यावर प्रपंचातल्या लाभहानीचे महत्त्व वाटत नाही. भगवंताचे स्वरूपच मुळी आनंदमय आहे. असा आनंदमय भगवंत आपल्या आतमध्ये असून आपण दुःख भोगतो याला कारण, भगवंताला प्रकट व्हायला आपणच आपल्या आतमध्ये आडकाठी करीत असतो. आपल्या आतमध्ये भगवंत तर आहेच, पण त्याचबरोबर ‘ मी ’ सुद्धा आहे. हा ‘ मी ’ कोण हे जाणण्याकरिता, इंद्रियांची गडबड शांत करून आतमध्ये आपण आनंदाचा शोध करावा; म्हणजे आपल्याला या ‘ मी ’ चे स्वरूपही आनंदमय असल्याचे प्रत्ययाला येईल. अशी परमात्म्याची ओळख करून घेणे ही खरी जीवनाची सुरुवात आहे; आणि परमात्म्यात विलीन होणे हेच जीवनाचे सर्वस्व होय.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

मनापासून घेतो, तेव्हा ते सत्तारुपाने आपल्या जवळ असतात आणि आपला प्रपंच, परमार्थ दोन्ही गोड करतात . त्यांची आठवण सार्वत्रिक ठेवणे म्हणजे सद्गुरूंचे होणे त्या शिवाय ते तुमचे होणार नाहीत. कुठेतरी आपली भावना चिकटवल्या शिवाय माणसाला समाधान नाही. ती इतरत्र न लावता सद्गुरू जवळ लावल्यास खरे समाधान मिळेल. अध्यात्म मार्ग पाहिल्यास हे माझ्या साठी आहे की नाही असे अनेकाना वाटते. पण सद्गुरुनी दिलेले नाम श्रद्धेने घेतल्यास सर्व साधते गुरु माउली असणे म्हणजे आईने मुलाचे बोट धरून चालवण्या सारखे होते. त्यामुळे वाट चुकण्याचा प्रश्नच येत नाही. आईचे प्रेम देहबुद्धीचे खरे, पण ते शुद्ध अन निस्वार्थी असते. तसे किंबहुना त्याहून अलौकिक असे प्रेम सद्गुरू जवळ मिळते म्हणून सद्गुरू म्हणजे असे काही कि जे सर्वस्वाची प्राप्ती करून घेउन फक्त तुम्हाला देण्यासाठीच असतात . क्रमशः



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

केचिदज्ञानतो नष्टाः केचिन्नष्टाः प्रमादतः ।केचिद् ज्ञानावलेपेन केचिन्नष्टैस्तु नाशिताः ॥स्पष्टीकरण - अज्ञान हे वाईट. ते माणसाला धोक्यात आणते. काही माणसे विचार न करता आपल्याला झेपणार नाहीत, अशा गोष्टी करायला जातात आणि नाश पावतात. काही माणसे ज्ञानाच्या गर्वाने फुगून जातात आणि तो गर्व त्यांचा नाश करतो. चौथे कारण वेगळे आहे. काही माणसे आधीच दिवाळखोर बनलेली असतात. त्यांना दुसऱ्याचे बरे बघवत नाही. ती उद्योग करणाऱ्याला धोक्यात आणायला कमी करीत नाहीत. हे चारी धोके टाळून माणसाने आपल्या प्रगतीचा मार्ग चोखाळावा.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



आठवणीतली गृहभेट पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ४ ऑगस्ट २०२३



आदरांजली पान ७


# वन जमिनीवर वास्तव्य करणाऱ्यांना बांधकामाची परवानगी द्या : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** वन जमिनीवर झोपड्या बांधून पिढ्या न पिढ्यांपासून वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांना वन हक्क दावा अंतर्गत जमिनीचा पट्टा मिळाला. याची नमुना आठवर नोंद असतानाही वन प्रशासनामार्फत मंजूर घरकुल बांधकामासाठी अडवणूक होत असल्याने हजारो कुटुंबीयांना घरकुलाच्या लाभापासून वंचित रहावे लागत असून त्यांचे पक्के घराचे स्वप्न अधांतरीच ठरले आहे. यात चंद्रपूर गडचिरोली भंडारा गोंदिया आदी जिल्ह्यांचा समावेश होत असून वन विभागामार्फत वन जमिनी पट्टे धारकांना घरकुल लाभार्थ्यांना घरे बांधण्याची तातडीने परवानगी द्या अशी मागणी विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात मांडून सभागृहाचे लक्ष वेधले.

राज्य सीमेवरील चंद्रपूर गडचिरोली भंडारा गोंदिया या अतिदुर्गम व नक्षलग्रस्त जिल्ह्यांमध्ये वन जमिनी मोठ्या प्रमाणात आहेत. तर अनेक ठिकाणी गेल्या पिढ्या न पिढ्यापासून विदर्भपातील या जिल्ह्यातील नागरिक झोपड्या बांधून वन जमिनीवर वास्तव करतात. अशा परिस्थितीत त्यांना वनविभागा अंतर्गत जमिनीचे पट्टे तर मिळाले. व नमुना आठ वर नोंदी ही झाल्या मात्र त्यांचा स्वतंत्र सातबारा न झाल्यामुळे मिळालेले पट्टे हे अजूनही लाभार्थ्यांच्या उपयोगी पडताना दिसत नाही. मिळालेल्या या वन जमिनीच्या पट्ट्यांवर जुनी झोपडी हटवून वास्तव्याकरिता पक्के घर बांधण्यासाठी अनेक पट्टे धारकांनी घरकुल योजनेत अर्ज केला. आणि शासन स्तरावरून त्यांना घरकुल योजनेचा लाभ ही मिळाला मात्र या वन हक्क पट्टा जमिनीवर घरकुल मंजूर असतानाही बांधकामा करिता वन प्रशासन अडवणूक करत असल्याने घरकुल लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न हे दिवास्वप्नच ठरत आहे. एकीकडे शासनाकडून वन हक्क पट्टे मिळाले आणि दुसरीकडून मात्र मंजूर असतानाही घरी बांधकाम करण्याकरिता अडवणूक करणे हे शासनाचे दुटप्पी धोरण असून याबाबत वनमंत्र्यांनी चारही जिल्ह्यातील प्रतिनिधींना सोबत घेऊन बैठक लावून सदर समस्या तात्काळ निकाली काढावी. अशी मागणी रेटून धरत विरोधी पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

**मरणवाट ठरत असलेल्या समृद्धी महामार्गाची वाहतूक थांबवा :** समृद्धी महामार्ग राज्याच्या विकासाचे मोठे पाऊल असले तरी सध्या सदर महामार्गावर होणाऱ्या विविध अपघातामुळे हा मार्ग "मरणवाट' ठरत आहे . सदर मार्ग अपघात मुक्त करण्यासाठी 150 किमी प्रति अंतरावर फूड सेंटर, संरक्षण सुविधा, रुग्णवाहिका, ट्रॉमा सेंटर व सुरक्षित बाबतच्या अन्य सुविधा उभारणीपर्यंत सदर मार्ग हा तात्पुरता बंद करण्यात यावा . जेणेकरून नागरिकांचा अपघाती मृत्यू पासून बचाव होईल . अशी मागणी विरोधी पक्षनेते आ .विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात केली .

# कलादिग्दर्शक नितीन देसाईंना अनेकांनी ब्लॅकमेल केले

## जितेंद्र आव्हाडांचा गौप्यस्फोट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रख्यात कलादिग्दर्शक नितीन देसाई यांनी २ ऑगस्ट रोजी कर्जत येथील एनडी स्टुडिओमध्ये गळफास लावून आत्महत्या केली आहे. ३० पेक्षा अधिक ऐतिहासिक चित्रपटांत त्यांनी कलादिग्दर्शनाचे काम केले होतं. नितीन देसाईंच्या आत्महत्येनं चित्रपट विश्वावर शोककळा पसरली आहे. त्यांनी आर्थिक तणावातून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार गट ) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नितीन देसाई यांच्या आत्महत्येबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे.

नितीन देसाई हे माझे अतिशय जवळचे मित्र होते. त्यांना अनेक लोकांनी ब्लॅकमेल केलं, असा गौप्यस्फोट जितेंद्र आव्हाडांनी केला आहे. ब्लॅकमेल करणारे लोक मुंबई MMRDA शी संबंधित आहेत, असा दावाही आव्हाडांनी केला. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.यावेळी जितेंद्र आव्हाड म्हणाले, नितीन चंद्रकांत देसाई हे माझे अतिशय जवळचे मित्र होते. नितीन देसाईंनी कधीही रस्त्यावर डेकोरेशन केले नव्हते. पण त्यांनी पहिल्यांदा माझ्या गणपतीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावर भलेमोठे डेकोरेशन केले. ते नितीन देसाईंचे रस्त्यावरील पहिले डेकोरेशन होते. मागच्या तीन वर्षात नितीन देसाईंच्या ज्या आर्थिक उलाढाली झाल्या, त्या सर्व उलाढालींची कसून चौकशी व्हायला पाहिजे. तसेच दरम्यानच्या काळात त्यांच्या कुणा-कुणाशी भेटी झाल्या ? कोण-कोण त्यांच्याविरोधात बोललं ? या सगळ्याची माहिती घेतली पाहिजे आणि त्या सर्वांची चौकशी केली पाहिजे.

या चौकशींमधून सत्य बाहेर आले पाहिजे. नितीन देसाईंना अनेकांनी ब्लॅकमेल केलं आहे. ते ब्लॅकमेल करणारे कोण आहेत ? याचा शोध पोलिसांनी घ्यायला पाहिजे. Edelweiss या वित्त कंपनीच्या मालकाचा नितीन देसाईंच्या आत्महत्येशी संबंध असेल तर त्यालाही तुरुंगात टाका. त्याचबरोबर नितीन देसाईंना आणखी कुणी-कुणी छळले, हे त्यांच्या जवळच्या मित्रांना माहीत आहे. त्यांच्या आत्महत्येशी गुजरातचे काहीही कनेक्शन नाही. सगळं कनेक्शन मुंबईच्या MMRDA शी आहे. माझा कुणावरही रोख नाही. पण पोलिसांनी व्यवस्थित शोध घ्यावा, आरोपी आपोआप ताब्यात येईल, असेही जितेंद्र आव्हाड म्हणाले.

# बारामती शेजारील मतदारसंघातही उभे राहायचे धाडस नाही

## अजित पवारांनी विधानसभेत दिली कबुली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अजित पवारांसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या जवळपास ४० आमदारांनी शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा दिला आहे. महाविकास आघाडी सरकार कोसळल्यानंतर विधानसभेच्या विरोध पक्षनेतेपदी अजित पवारांची नियुक्ती करण्यात आली होती. पण त्यानंतर काही दिवसांनी स्वतः अजित पवारच काही आमदारांना घेत सत्तेत सामील झाले. त्यामुळे विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची जागा रिक्त झाली होती. या जागेवर आता महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विजय वडेट्टीवार यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती झाल्यानंतर विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात अभिनंदन प्रस्ताव आणण्यात आला. अभिनंदन प्रस्तावावर बोलत असताना अजित पवारांनी जोरदार टोलेबाजी केली. दरम्यान, त्यांनी बारामती शेजारील मतदारसंघात निवडणुकीला उभे राहायचे आपले धाडस नाही, अशी कबुलीही दिली. तसेच त्यांनी विजय वडेट्टीवार यांच्या राजकीय कारकीर्दीचे कौतुकही केले. विजय वडेट्टीवार यांना उद्देशून अजित पवार म्हणाले, तुम्ही जेव्हा शिवसेनेत प्रवेश केला. तेव्हा विदर्भात शिवसेनेचे अस्तित्व नव्हते. पण तुम्ही चंद्रपूर, चिमूर आणि ब्रम्हपुरी अशा ठिकाणी शिवसेना वाढवण्याचं काम केले. त्यामध्ये तुमच्या वरिष्ठांनीही तुम्हाला मार्गदर्शन केले. पण तुमचे सगळे काम बघूनच १९९८ साली तुम्हाला विधान परिषदेचे सदस्यपद मिळाले. त्यानंतर आज तुम्ही विधानसभेत विरोधी पक्षनेता झाला आहात. तुमची विधीमंडळातील २५ वर्षांची राजकीय कारकीर्द झाली आहे. पुढेही तुमची कारकीर्द अशीच चालू राहणार आहे. कारण तुम्ही शिवसेनेत असो वा काँग्रेसमध्ये तुम्ही तुमची राजकीय भूमिका सोडली नाही. आमच्या भागात मतदारसंघ बदलणे फार अवघड असते, म्हणजे मी बारामतीत पहिल्या क्रमांकाने निवडून येईल. पण शेजारच्या मतदारसंघात उभे राहायचे धाडस आपण दाखवू शकत नाही. पण तुम्ही संगमनेरमध्येही उभे राहून प्रचंड मताने निवडून येऊ शकता. आम्ही दुसऱ्या मतदारसंघात जाताना दहावेळा विचार करतो. पण तुम्ही मात्र चिमूरला निवडून आलात. ब्रम्हपुरीला दोनवेळा चांगल्याप्रकारे निवडून आलात. अर्थात तुमचे काम चांगले आहे. तुमचा जनसंपर्क चांगला आहे, म्हणूनच तुम्ही हे सगळे करू शकलात, असेही अजित पवार म्हणाले.

# 'त्या' अधिकाऱ्यावर देशद्रोहाचा खटला का नाही : जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काही दिवसांपूर्वी पुणे येथे डीआरडीओचा उच्च पदस्थ अधिकारी प्रदीप कुरुलकर याला एटीएसने अटक केली. मात्र त्याच्यावर ऑफिशियल सिक्रेट ऍक्ट अंतर्गत खटला सुरू आहे. मात्र हा खटला देशद्रोहाच्या गुन्ह्यांतर्गत का चालवला गेला नाही असा खडा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उपस्थित केला. या अधिकाऱ्यावर हनीट्रॅपमध्ये अडकून एका पाकिस्तानी महिलेला देशाच्या गुप्त माहित्या इतर देशांना पुरवल्याचा आरोप आहे. या अधिकाऱ्यावर देशद्रोहाचा खटला चालवायला हवा. त्याच्या विरोधात देशद्रोहाचा खटला का चालला नाही याची तपासणी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांना द्या अशी मागणीही त्यांनी विधानसभा अध्यक्षांकडे केली.

# देशातील प्रसिद्ध संवरलाल ऑस्टीयोपॅथी चॅरिटेबल संस्था चंद्रपूरात करणार ऑस्टिओपॅथीची मोफत तपासणी

## आ. किशोर जोरगेवार यांचे आमंत्रण, डिसेंबरमध्ये शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशातील प्रसिध्द संवरलाल ऑस्टीयोपैथी चँरिटेबल संस्था आणि पाथकाइंड लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने जोधपूर येथे आयोजित आरोग्य शिबिराला आमदार किशोर जोरगेवार यांनी भेट दिली यावेळी आ. जोरगेवार यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी आमदार जोरगेवार यांनी उपचार पध्दतीबाबत माहिती घेत सदर शिबिर चंद्रपूरात आयोजित करण्याचे आमंत्रण संस्थेला दिले आहे. त्यांनी हे आमंत्रण स्वीकारले असून डिसेंबर महिण्यात या शिबिराचे नियोजन करण्यात येणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.



जोधपूर येथे आयोजित आरोग्य शिबिराला संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर पाराशर, डॉ. गिरिराज पाराशर, समाजसेवक भागीदार वैष्णव, उम्मेद राज जैन, माजी मंत्री राजेंद्र चौधरी, कोर कमांडर पीएस मनास, जयेश धुत यांची प्रमुखतेने उपस्थिती होती. हाडांच्या आजाराच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. या आजारावरील उपचार पध्दती महागडी असल्याने सर्व सामान्यांना ती परवडण्यासारखी नाही. परिणामी अनेक नागरिक या आजारांमुळे वेदनादाई जिवन जगत आहे. दरम्यान आ. किशोर जोरगेवार यांच्या वतीने शहरात आयोजित आरोग्य शिबिरांमध्येही हड्डीच्या आजाराने ग्रस्त असलेल्या अनेक रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे यावर कायमस्वरुपी उपचार व्हावा यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे विविध आरोग्य संस्थासह संपर्क सुरु होता. दरम्यान त्यांनी जोधपूर येथे जात देशातील प्रसिध्द संवरलाल ऑस्टीयोपैथी चँरिटेबल संस्थेच्या आरोग्य शिबिराला भेट देत त्यांची उपचार पध्दती समजून घेतली. गंभीर स्वरुपाच्या अनेक रुग्णांना या शिबिराचा फायदा झाला. पाराशर कुंटुबातील तिसरी पिढी हे सेवेचे काम करत आहे. त्यांनी अनेकांना हाडांच्या त्रासाच्या वेदनेतून मुक्त करत नवे जिवन दिले आहे. त्यांचे हे कार्य ईश्वरीय असल्याचे आ.किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. या हाड तपासणी शिबिराचा मुख्य उद्देश 25 वर्षांवरील लोकांची हाडांची घनता तपासणे हा असून त्यांना भविष्यात हाडांच्या आजारांपासून बचाव करणे हा आहे. या चाचणीद्वारे हाडांची घनता तपासून त्यांची ताकद जाणून घेता येते. असेच आरोग्य शिबिर चंद्रपूरात आयोजित करण्या संदर्भात त्यांनी संस्थेला आमंत्रीत केले आहे. त्यांनीही आमदार किशोर जोरगेवार यांचे आमंत्रण स्विकारत चंद्रपूरात आरोग्य शिबिर घेण्याचे मान्य केले आहे. डिसेंबर महिण्यात या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्याचे नियोजन आता यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने केल्या जात असून चंद्रपूर जिल्ह्यसह संपूर्ण विदर्भातील रुग्णांना या शिबिराचा लाभ घेता यावा असे उत्तम नियोजन करण्याच्या सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांना केल्या आहे.




# पुन्हा वडेट्टीवार

आधुनिक केसरी

राज्याच्या विरोधी पक्षनेते पदी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १ ऑगस्ट रोजी काँग्रेस नेत्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे विजय वडेट्टीवार यांच्या नावा नियुक्तीबाबत पत्र लिहिले होते. काँग्रेसकडून आलेली ही शिफारस राहुल नार्वेकर यांनी मान्य केली असून विजय वडेट्टीवार यांच्या विरोधी पक्षनेते पदाच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे. त्यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदन सादर करत त्यांचे अभिनंदन केलं. आता त्यांच्यावर राज्यातील अनेकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होतो. काँग्रेस नेते सचिन सावंत यांनीही विजय वडेट्टीवारांबाबत ट्वीट केलं आहे. दुसऱ्यांदा विरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्याबद्दल विजय वडेट्टीवार यांचे हार्दिक अभिनंदन! विजयभाऊ विरोधीपक्षनेते असताना मविआ सरकार आले. महाराष्ट्राला सत्तेत सामिल होणारा नव्हे तर सत्ता खेचून आणणारा विरोधीपक्षनेता मिळाला आहे. आता खऱ्या अर्थाने जनहितार्थ सरकारला धारेवर धरले जाईल", अशा शब्दांत काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी विजय वडेट्टीवार यांचे अभिनंदन केले. पावसाळी अधिवेशनाच्या आधीच राज्यात राजकीय उलथापालथ झाली. राज्याच्या विरोधी बाकावर असलेले अजित पवार सत्तेत सामिल झाले. त्यामुळे विरोधी पक्षनेते पद रिक्त झाले. राज्यात महाविकास आघाडी विरोधी बाकावर आहे. महाविकास आघाडीत राष्ट्रवादीकडे तुलनेने सर्वाधिक सदस्य संख्याबळ होते, त्यामुळे विरोधी पक्षनेते पद राष्ट्रवादीकडे होते. परंतु, अजित पवारांनी महाविकास आघाडीतील पाठिंबा काढून घेत पक्षात फूट पाडली. त्यामुळे त्यांच्यासह पक्षातील अनेक आमदार गेले. परिणामी महाविकास आघाडीत शरद पवारांच्या गटाची विधानसभेतील सदस्य संख्या घटली. त्यामुळे विरोधी पक्षासाठी आता काँग्रेसकडे सर्वाधिक सदस्य संख्या असल्याने हे पद काँग्रेसकडे गेले आहे. नाना पटोले, बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाणांसह अनेक नेत्यांची नावे विरोधी पक्षनेते पदासाठी पुढे येत होती. परंतु, काँग्रेसकडून अधिकृत घोषणा करण्यास दिरंगाई झाली. अखेर, १ ऑगस्ट रोजी विजय वडेट्टीवार यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. तर, आज राहुल नार्वेकर यांनी त्यांच्या नियुक्तीला मान्यता दिली. त्यानुसार, त्यांनी आज विधानसभेतील विरोधी पक्षनेत्याची जागा स्वीकारली. माजी विरोधी पक्षनेते आणि विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हाताला धरून विजय वडेट्टीवार यांना विरोधी बाकावर विराजमान केले. पावसाळी अधिवेशाचे सुरुवातीचे दोन आठवडे विरोधी पक्षनेत्याशिवाय गेले. तर, अधिवेशन संपायला आता अवघे दोनच दिवस उरले आहेत. त्यामुळे शेवटच्या दोन दिवसांत नवनियुक्त विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार किती आक्रमक होतात हे पाहावे लागणार आहे.

# जन्या आणि मन्या एकाच माळेचे मणी



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**मित्रांनो जय गुरु अलीकडेच महात्मा गांधी, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, संत तुकाराम संत साईबाबा आणि आमच्या माता भगिनींच्या विषयी अत्यंत विकृत खालच्या दर्जाचं अपमानजनक विधान करून आपलं तोंड काळ करणारा आणि 15 ते 25 या संवेदनशील वयोगटातील मुलांच्या मनात मुस्लिम द्वेष व तिरस्कार निर्माण करून शिक्षणाने माणूस गांडू होतो मग शिकायचं कशाला? असं म्हणत हजारो बहुजन तरुणांचं करिअर बरबाद करण्यासाठी त्यांना निदर्शने मारामाऱ्या करायला लावून दंगलीमध्ये ढकलणारा शिवप्रतिष्ठानचा अध्यक्ष मनोहर (मन्या)उर्फ तथाकथित संभाजी भिडे याचा वादग्रस्त विदर्भ दौरा झाला.**

अमरावती येथील सभेच्या पूर्वी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज निर्मित सर्व धर्म पंथ संप्रदायाचे प्रतीक आणि मानवतेचे धाम असलेले गुरुकुंज आश्रम मोझरी येथे त्यांचे आगमन झाले. या देशातून धर्मसमभाव संपवा अशा पद्धतीचे विधाने मनोहर कुलकर्णी यांनी यापूर्वी अनेक वेळा केलेली आहे. अशा विकृत मेंदूच्या आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या तत्त्वज्ञानाच्या संपूर्ण विरोधात प्रचार प्रचार करणाऱ्या विषारी आणि विखारी व्यक्तीचे गुरुकुंज आश्रमातील अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अत्यंत आदरपूर्वक स्वागत केले. त्याबद्दल सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. गुरुदेव प्रेमींमध्ये तीव्र नाराजी असुन ठिकठिकाणी सभा घेऊन गुरुदेव सेवा मंडळाच्या जिवंत हृदयाच्या कार्यकर्त्यांनी वरील विषयी मनोहर कुलकर्णी यांचा जाहीर निषेध केलेला आहे.
आपल्याला माहीतच आहे की, गुरुकुंज आश्रम हा जनार्दन (जन्या) बोथे अँड कंपनी झालेली आहे. सर्वप्रथम हे दोघेही गुर्जी आहेत. शिवप्रतिष्ठान मध्ये मनोहर कुलकर्णी यांची एकाधिकारशाही आहे. कुठल्याही कार्यकर्त्यांना चिकित्सकपणे प्रश्न विचारण्याची परवानगी नाही.ते सांगतील तो आदेश पाळायचा असा नियम आहे. गुरुकुंज आश्रमात बोथे गुर्जींची एकाधिकारशाही आहे. जी व्यक्ती त्यांच्या ताटाखालचं मांजर होऊन राहायला तयार असेल अशीच व्यक्ती सर्वाधिकारी होते. आणि अधिक काळ टिकून राहते. त्यामुळे सर्वाधिकारी ही फक्त एक शोभेची वस्तू झालेली असून त्यांना कुठलेही अधिकार राहिलेले नाहीत.

पुराव्या दाखल अलीकडेच तुकाराम दादांनी स्वतंत्रपणे निर्माण केलेले अध्यात्म गुरुकुलचा सातबारा अधिकाऱ्यांना लाच देऊन बोथे अँड कंपनीने बदलवला.सदर प्रकरण घेऊन एक शिष्टमंडळ तात्कालीन सर्वाधिकाऱ्यांकडे गेले असता या प्रकरणात माझ्याकडून कुठलीही अपेक्षा करू नका असं सांगण्यात आल. यावरून गुर्जी म्हणतील ती पूर्व दिशा असाच भोंगळ कारभार सुरू आहे. गांधी, डॉ. आंबेडकर, फुले हे राष्ट्र निर्माते आपल्या भारत देशाचा प्राण आहे.नव्हे तो आमचा श्वास आहे. श्वास रोखला की माणूस गुदमरतो आणि म्हणून मनोहर कुलकर्णी या नालायक माणसाने आपली गच्ची पकडलेली आहे. सारा बहुजन समाज गुदमरलेला असुन स्वतंत्र भारतामध्ये इतक्या उघडपणे वरील राष्ट्रनिर्मात्यांच्या विषयी अत्यंत खालच्या दर्जाचे विधान आजपर्यंत कधीही कोणी केलं नाही. प्रतिक्रांती आपल्या दरवाज्यात उभी आहे.
पूज्य तुकाराम दादा गीताचार्य, नारखेडे दादा, वेरूळकर गुरुजी, सत्यपाल महाराज, हे श्री गुरुदेव सेवा मंडळाचा प्राण आहे. जितका तिरस्कार भिडे वरील राष्ट्रनिर्मात्यांचा करतात तितकाच तिरस्कार ही बोथे अँड कंपनी स्वतंत्रपणे काम करणाऱ्या वरील व्यक्तीचा करतात. तुकाराम दादांनी गुरुदेव सेवा मंडळाच्या ४०००शाखा उघडल्या त्या वजा केल्या तर सेवा मंडळामध्ये काहीही शिल्लक राहत नाही. म्हणून ते सेवा मंडळाचा प्राण होते. परंतु तुकाराम दादा जिवंत असताना या बोथे अँड कंपनीने त्यांना कोर्टात खेचले होते. याला म्हणतात ब्राह्मण्य ! आम्ही ब्राह्मणांच्या विरोधात नाही. ब्राह्मण्याच्या विरोधात आहोत. ब्राह्मण्य म्हणजे स्वतः कष्ट न करता इतरांनी कष्टातून मीळवलेला आनंद त्याला लुटू न देता स्वतः लुटायचा आणि म्हणून अध्यात्म गुरुकुल मोझरी, भू वैकुंठ अड्याळ टेकडी, आणि ग्रामगीता तत्त्वज्ञान दर्शन मंदिर पंढरपूर हे तुकाराम दादांनी स्वतंत्रपणे स्वकष्टाने निर्माण केलेली संस्थाने बोथे अँड कंपनीने हडप करण्याचा एक कलमी कार्यक्रम चालवला आहे. ही बोथी अँड कंपनी फुकटचं खाणारी ब्राह्मणी व्यवस्था बनलेली आहे. अरे एका फकीरानं एवढं मोठं विश्व उभं केलं आणि तुम्हाला राष्ट्रसंतांनी एवढी मोठी संस्था ताब्यात दिली तुम्ही त्याचा किती विस्तार केला. हा प्रश्न आता या बोथे अँड कंपनीला गुरुदेव सेवकांनी विचारला पाहिजे.
नारखेडे दादांनी आपलं सर्वस्व समर्पित केलं परंतु जिवंतपणीच नारखेडे दादांचा इतका अपप्रचार या बोथे अँड कंपनीने केला की नारखेडे दादा मेल्यानंतर हे गुरुकुल म्हणजे त्यांच्या



नातेवाईकाची संपत्ती होईल. दादा गेले गुरुकुल उभ आहे. आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी म्हणजे प्रचारक निर्मितीचा कारखानदार. स्वतंत्रपणे संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेर सातत्याने संस्कार शिबिराच्या माध्यमातून प्रचारक निर्मितीचा यज्ञकुंड पेटवून तो सतत तेवत ठेवणारा तपस्वी सेवा मंडळात अन्यत्र कोणीही नाही. परंतु नांदोरा आश्रम हडप करण्यासाठी याच बोथे अँड कंपनीने त्यांना कोर्टात खेचले होते. दास टेकडी येथील संस्कार शिबिराच्या मुलामुलींसाठीचे शौचालय जे सी पी ने पाडण्याचा घाट याच बोथे अँड कंपनीने केला होता. इतका द्वेष इतका मत्सर त्या मन्या ( मनोहर कुलकर्णी ) मध्येच तुम्हाला पाहायला मिळेल. आणि म्हणून त्या मन्या पेक्षा हा जन्या काकणभर शिवाई आहे. हे ही आपण लक्षात घेतलं पाहिजे. सत्यपाल महाराज हे गुरुदेव सेवा मंडळाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टार प्रचारक आहेत.परिवर्तनाच्या चळवळीमध्ये प्रचार प्रसार सत्ता ही अत्यंत महत्त्वाची सत्ता असून ही आपल्या हातात असली पाहिजे हे राष्ट्रसंतांनी ओळखले होते आणि म्हणून गुरुकुंजात प्रचार विभागाची त्यांनी स्थापना केली होती.आणि म्हणून राष्ट्रसंत म्हणतात त्यांच्या विषारी प्रचाराहून| झाला पाहिजे प्रबळ पूर्ण| सत्य आपला प्रचार महान| तरीच परिवर्तन सहज घडे| राष्ट्रसंताची वरील ओळीचं जिवंत उदाहरण म्हणजे सत्यपाल महाराज होय. सत्याचा ठेवा जपत गेली ५५ वर्ष हा माणूस राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा विचार सर्व जाती धर्म पंथ संप्रदायांच्या स्टेजवर जाऊन अत्यंत ताकदीने करतो आहे. राष्ट्रसंताचा विचार साता समुद्र पार नेणारा असा प्रचारक गुरुदेव सेवा मंडळामध्ये अन्यत्र कोणी नाही. परंतु राष्ट्रसंत समूह या ग्रुपवर महाराज स्वतः ॲड असून सत्यपाल महाराजांची अत्यंत खालच्या दर्जामध्ये निंदा नालस्ती करण्यात आली. सत्यपाल महाराजांना विश्वभूषण द्या त्याच्या खंजिरी वाजवणाऱ्या चेल्यांना भारत भूषण द्या. आणि तुकडोजी महाराजांना ग्रामभूषण द्या. अर्थात तुकडोजी विरुद्ध तुकाराम दादा तुकडोजी विरुद्ध नारखेडे दादा आणि आता विलास साबळे नावाच्या महाशयांनी तुकडोजी विरुद्ध सत्यपाल अशा पद्धतीचं घाणेरड आणि विकृत प्रचार तंत्र राबवलेलं आहे. भगव्या टोपीच्या खाली इतका मुस्लिम द्वेष लपलेला आहे हे राष्ट्रसंत समूह या ग्रुप वरून सिद्ध झालेलं आहे. शेवटी वाद इतका विकोपाला गेला की हा व्हाट्सअप ग्रुपच एडमिनला डिलीट करावा लागला. त्यामुळे गुरुकुंज आश्रम हा आरएसएसचा राजकीय अड्डा बनलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. छत्रपतींची बदनामी करणाऱ्या जेम्स लेन आणि कोशारी या प्रकरणात मनोहर कुलकर्णीचे शिवप्रतिष्ठान रस्त्यावर उतरले नाही. त्यामुळे त्यांचं छत्रपती प्रेम हे किती बेगडी आहे हे आपण नीटपणे समजून घेतलं पाहिजे.अगदी त्याचप्रमाणे आपल्या राज्यामध्ये देशांमध्ये कुठलीही अप्रिय घटना घडली मग तो राष्ट्रपुरुषाचा अपमान असो. महिलांवर होणारा बलात्कार असो. या बोथे अँड कंपनीने कधीही पत्रकार परिषद घेऊन कुठलीही भूमिका आज पर्यंत मांडली नाही. जेव्हा महात्मा गांधींचा नथुराम गोडसे खून केला तेव्हा स्वता महाराज धावले. त्यांनी विश्वशांती नाम सप्ताह घेऊन या संपूर्ण देशातील जनतेचे सांत्वन केले. या देशांमध्ये दंगल होऊ दिल्या नाही. परंतु राष्ट्रसंताचे हे संस्कार ही बोथे अँड कंपनी संपूर्णपणे विसरलेली आहे. राष्ट्रसंताचे धर्म समन्वयाचे विचार बासणात गुंडाळून गुरुकुंजात जर देश विघातक कारवाया करणाऱ्या संघटनांचे शिबिरे होत असेल तर आता सर्वसामान्य जनतेने व गुरुदेव प्रेमींनी सावधपणे ठोस भूमिका घेण्याची वेळ आलेली आहे.

मनोहर कुलकर्णी हे छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख भगवान शिवाजी महाराज असा करतात. नैवेद्य दाखवायला मंत्र म्हणायला लावतात. मंदिर बांधायला सांगतात. अर्थात शिवाजी महाराजांचा दैवतीकरण करून त्यांचं कर्तृत्व खतम करण्याच षडयंत्र गुर्जी करतात. बोथे अँड कंपनीचे मालक आमचे गुर्जी सुद्धा राष्ट्रसंतांना भगवान समजतात. त्यांचे होयबा कार्यकर्ते भगवान तुकडोजी महाराज असं जाणीवपूर्वक म्हणतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जयंती उत्सव त्यांना पाळण्यात घालून झोके देऊन केला जातो. ज्या राष्ट्रसंतानी भगवान बुद्धांची २५००वा जयंती महोत्सव 100 गावांमध्ये प्रत्येकाने एक तास काम करायचं असा कोटी तासाचा समय दान यज्ञ करून साजरा केला केला त्या राष्ट्रसंताचा जन्मोत्सव जर त्यांना पाळण्यात घालून झोका देऊन केला जात असेल यापेक्षा दुसरी लाजीरवाणी आणि तत्त्वज्ञानाला आणि संविधानाला मातीत मिळवणारी गोष्ट दुसरी कुठली असू शकेल. आणि म्हणून जन्या असो की मन्या आपलं वर्चस्व अबाधित टिकून ठेवण्यासाठी जीवाचा आटापिटा करत असतात. याच पुरोहितशाहीला आमचा विरोध आहे. जात कुठलीही का असेना जन्या आणि मन्या एकाच माळेचे मणी !

# गुरूजी शब्दाची आपत्ती, तर मग स्व.शंकरराव चव्हाण हेडमास्तर त्याचे काय?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महापुरूषांच्या विरोधात संभाजी भिडे यांनी केलेल्या वक्तव्याचं समर्थन मुळीच नाही. सरकारनं कायदेशीर पावलं त्यांच्या विरोधात उचलली असुन कठोर कारवाई करण्याचं आश्वासन गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत दिलं. मात्र त्यांच्या गुरूजी शब्दावर अनेकांनी आपत्ती बोलुन दाखविली. ज्यांना पृथ्वीराज बाबा म्हटल्या जातं. कदाचित ते कुठलेही बाबा नाहीत. त्यांनाही गुरूजी शब्दाचा तिटकारा आला. अमोल मिटकरी सारख्यांनी संताप बोलुन दाखविला. त्यांना गुरूजी का म्हणायचे?या शोधातही आम्ही जात नाहीत. पण एकेकाळी भारतीय संस्कृतीत गुरूकुल पद्धत ज्याला आचार्य म्हणून ओळखल्या जायचे. जो मार्गदर्शक असतो त्यालाही गुरू म्हणून ओळखल्या जायचं.**

वारकरी संप्रदायात साधु संतांनादेखील गुरूजी म्हणतात. केवळ शिक्षकी पेशा असणाऱ्यालाच गुरूजी हे नाव लावल्या जातं असं नव्हे तर ही संस्कृतीत परंपराच आहे. ज्याचं छातीठोक समर्थन फडणवीसांनी विधानसभेत बोलुन दाखवलं की ते आमच्यासाठी गुरूजीच आहेत.
केंद्रात आणि राज्यात भाजपचं सरकार असुन राज्यात शिंदे गट, पवार गट यांना सोबत घेवुन भाजप सत्ता चालवते. विरोधक बिथरले असुन केवळ राजकिय बदनामी करण्यासाठी कुठलाही मार्ग शोधतात आणि मग सत्ताधाऱ्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करतात. गंमत बघा, विधानसभेचं पावसाळी अधिवेशन सुरू आहे. विरोधकांना सामाजिक प्रश्नाचं एक टक्कासुद्धा गांभीर्य नाही. दोन-चार दिवस त्यांनी भिडे गुरूजी याच प्रश्नावर घालवले. अर्थात संभाजी भिडे यांनी महापुरूषांचा अपमान केला. ते चुकीचे असुन त्यांचं समर्थन आम्ही करत नाहीत. पण एखादा प्रश्न केवळ राजकिय बदनामी करण्यासाठी हाती घ्यायचा आणि जनतेची दिशाभुल करायची. हे उद्योग सद्या शिल्लक राहिलेल्या ठाकरे शिवसेना, विशेष करून राष्ट्रीय काँग्रेस यांचे सुरू असल्याचं लक्षात येतं. सोमवार,मंगळवार अधिवेशनाचे दोन दिवस गुरूजी या शब्दांत गुरफटल्या गेले. गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस निवेदन करत असताना भिडे गुरूजी म्हणू नका अशा प्रकारचा आक्षेप विरोधकांनी घेतला. ज्यांना बाबा का म्हटल्या जातं? कारण बुवाबाजी करणारे बाबा असतात.नव्हे तर वारकरी संप्रदायात साधु संत म्हणुन काम करणाऱ्यांनाही बाबाची पदवी दिल्या जाते. पृथ्वीराजांना कशामुळे दिली? हा शोध लागणे बाकी असलं तरी टोपणनाव मग बाबा असेल की गुरूजी? भिडे गुरूजी हे शिक्षक होते का? त्यांनी शिक्षक पदासाठी पदवी घेतली का? त्यांचं शिक्षण काय? या भानगडीत आम्ही जात नाहीत. पण त्यांना गुरूजी म्हणून ओळखल्या जातं. हे नविन नाही. वर्षानुवर्षापासून टोपणनावाने त्यांची ओळख आहे. या शब्दावर विधानसभेत अधिवेशनात अनेकांनी आक्षेप घेतला. गुरूजी ज्याला आचार्य म्हणुनही ओळखल्या जाते. खरं तर ही भारतीय संस्कृतीत अनादिकाळापासून सुरू असलेली परंपराच आहे. कदाचित व्यवसायाने गुरूजी नसतील पण वर्तनानुसार गुरूजी म्हणण्याचं




पुर्वांपार चालत आलं. आपल्याकडे काही काळी राज्याचं नेतृत्व कै.शंकरराव चव्हाणांनी केलं. त्यांना राज्यातील लोक नव्हे तर मिडियावाले देखील हेडमास्तर म्हणुन ओळखायचे. प्रशासनावर त्यांचा वचक होता. शासकिय योजना राबविताना कामे करून घेण्याची त्यांच्यात असलेली धमक आणि प्रशासनावर असलेलं वर्चस्व त्यांना अगदी काँग्रेस पक्षात देखील सारेच हेडमास्तर म्हणून ओळखायचे. टोपण नाव असणं ही खऱ्या अर्थाने प्रत्येकाच्या आयुष्यात आलेली बाबच म्हणावी लागेल. एकाच नावाने माणसाला ओळखलं जात नाही. भाऊ, बाबा, दादा, आबा, गुरूजी, गुरू, आचार्य, काका, मामा, आण्णा, तात्या अशी टोपण बिरूदावली अनेकांच्या नावाला लावली जाते. तशीच कदाचित भिडे गुरूजी यांच्या बाबतीत लावलेली असावी. पण याचा तिटकारा येण्याची विरोधकांना गरज काय? बाकी काही असलं तरी केवळ द्वेषाचं राजकारण करायचं आणि जातीपातीच्या आधारावर बोट ठेवत हिणवायचं ही काँग्रेसवाल्यांची सवय अगदी जुनीच आहे. त्यातुनच मती गेल्यासारखं यशो बोलायचं आणि वेगळा आविर्भाव दाखवायचा. ज्यांना गुरूजी या शब्दाची परंपराच कळाली नाही असे राजकारणी खऱ्या अर्थाने नव्या पिढीला काय आदर्श देणार? हा प्रश्न पडतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

## आधुनिक केसरी वॉच

# विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या रास्त

### *अधिवेशनात आ. अमित झनक यांनी सरकारचे लक्ष वेधले*



**विधिमंडळात आ. झनक यांनी नाना पटोले व भाई जगताप यांच्या सोबत शिष्टमंडळाची भेट करुन दिली.**

मुंबईत विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनामध्ये रिसोड, मालेगाव मतदारसंघाचे वैदर्भीय आमदार अमित झनक यांनी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीने आजवर केलेल्या आपल्या प्रलंबित मागण्यासाठीच्याअनेक आंदोलनाचा दाखला देत, विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा प्रलंबित मागण्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला.

मे महिन्यात बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीने मुंबई येथील आझाद मैदानावर तब्बल दहा दिवस आंदोलन केले होते. त्याचा अहवाला देत, आंदोलन स्थळी शासनाचे प्रतिनिधी म्हणून मंगल प्रसाद लोढा यांनी आंदोलकांची भेट घेतली होती. सदर भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत शासनाचे प्रतिनिधी लोढा यांनी मागण्याबाबत मुख्यमंत्री सकारात्मक असल्याचे सांगून, आंदोलकांना आंदोलन मागे घेण्यास सांगितले होते. सरकारच्या या आश्वासनास जवळपास दोन महिन्याचा कालावधी लोटला आहे ,पण सरकारने अद्याप पर्यंत या संदर्भात कुठलाही ठोस निर्णय घेतला नाही. विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या मागण्या रास्त असून, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा. म्हणून विदर्भातील शेतकऱ्यांचा लोकप्रतिनिधी या नात्याने, मी माझ्या माध्यमातून हा लक्षवेधी मुद्दा सभागृहात मांडला आहे. असे ठणकावून सांगत याचा सरकारने गांभीर्यपूर्वक विचार करावा अशी विनंती सुद्धा आमदार अमित झनक यांनी सभागृहात बोलतांना केली आहे.

तत्पूर्वी, अधिवेशनाच्या अनुषंगाने विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीचे शिष्टमंडळ सरकारने दिलेल्या आश्वासनाचा पाठपुरावा करण्यासाठी विधिमंडळ परिसरात ठाण मांडून बसले होते. त्यांनी वाशिम जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव मतदार संघाचे आमदार अमित झनक यांची भेट घेऊन विधिमंडळात प्रश्न उपस्थित करण्याची विनंती केली होती. यावेळी शिष्टमंडळा सोबत झालेल्या चर्चे दरम्यान, आमदार झनक यांनी आश्वासन दिले होते की, मला शेतकऱ्यांच्या समस्यांची जाण आहे. म्हणून, केवळ प्रश्नच उपस्थित करणार नाही..! तर शेतकऱ्यांच्या मागण्या सरकारने मान्य कराव्या अशी आग्रही विनंती सुद्धा करणार आहे. आणि ते आश्वासन आमदार जनक यांनी सभागृहात पूर्ण केले.



वसंत खडसे
9373578429

आपल्या विदर्भ प्रदेशातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी विधिमंडळ परिसरात ठाण मांडून बसलेल्या शिष्टमंडळाला आपल्याकडून होईल तेवढे सहकार्य व्हावे. या उद्देशाने आमदार अमित झनक यांनी विधिमंडळात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार नानाभाऊ पटोले, आ. भाई जगताप त्यांच्यासोबत सदर शिष्टमंडळाची बैठक सुद्धा घडवून आणली होती. यावेळी समिती अध्यक्ष मनोजभाऊ तायडे, कार्याध्यक्ष माणिकराव गंगावणे हे आमदार झनक यांच्यासोबत उपस्थित होते. विदर्भातील शेतकऱ्यांचा महत्त्वाचा मुद्दा रिसोड, मालेगाव मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार अमित झनक यांनी अधिवेशनात मांडल्यामुळे विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीने आभार मानले असून, आमदारा प्रती समाधान व्यक्त केले आहे.

# घुग्घूस येथील भूस्खलनबाधितांच्या पुनर्वसनासाठी शासकीय भूखंड उपलब्ध

## सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराला यश

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** जिल्हयातील मौजे घुग्घुस गावात झालेल्या भुस्खलनामुळे बाधित 169 कुटुंबियांचे पुनर्वसनासाठी शासकीय भूखंड उपलब्ध करुन देण्याचा मार्ग आज मोकळा झाला आहे. चंद्रपूरचे पालकमंत्री ना.श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या विनंतीनुसार महसूल मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधान भवनात आयोजित केलेल्या बैठकीत हा निर्णय आज झाला. भूस्खलनग्रस्तांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असल्याची ग्वाही या बैठकीत पालकमंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली, तर या मदतीबाबत शासन सकारात्मक असल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी सांगितले. चंद्रपूर जिल्ह्यातील मौजे घुग्घुस गावात झालेल्या भूस्खलनात घरे गमावलेल्या बाधित १६९ कुटुंबियांच्या पुनर्वसनासाठी शासकीय भूखंड कशा पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येईल याबाबतची आढावा बैठक विधानभवनात महसूल मंत्री श्री. विखे- पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला वन तथा चंद्रपूरचे पालकमंत्री श्री सुधीर मुनगंटीवार, मदत व पुनर्वसन तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. अनिल पाटील, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी श्री विनय गौडा यांच्यासह संबधीत अधिकारी, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष श्री देवराव भोंगळे, भाजपा जिल्हा सरचिटणिस श्री संजय गजपुरे, श्री विवेक बोढे, श्री विनोद चौधरी, श्री तुलसीराम ढवस, श्रीमती चंदाताई कार्ले, श्रीमती रेखाताई मेश्राम, श्रीमती अनुसुयाताई घोडके, श्री शिवम घोडके आदी मौजे घुग्घुस या बाधित गावचे गावकरी प्रतिनिधी उपस्थित होते. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी चंद्रपूर जिल्हयातील मौजे घुग्घुस गावात भुस्खलनामुळे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी या बैठकीत अनेक प्रशासकीय सूचना केल्या. त्यावर साधक बाधक चर्चा होऊन महसूल विभागाने प्रस्तावित केलेली जमिन भूस्खलन बाधितांच्या पुनर्वसनासाठी हस्तांतरित करण्याची प्रक्रिया येत्या 15 दिवसात पूर्ण करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयामुळे घुघ्घुस येथील भूस्खलनग्रस्त बाधितांना घरकुलांसाठी जमिनीचे पट्टे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून कालबद्ध प्रक्रियेतून या जमिनी बाधितांच्या घरकुलांसाठी आता उपलब्ध होतील. यावेळी श्री. विखे- पाटील म्हणाले की, राज्यातील बाधितांचे पुनर्वसन लवकरात लवकर व्हावे यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. चंद्रपूर जिल्हयातील मौजे घुग्घुस गावाचे पुनर्वसन करण्यासाठी तसेच शासकीय भूखंड कसा उपलब्ध करुन देता येईल याबाबतचा विस्तृत आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.




# विद्यार्थी चांगले नागरिक म्हणून घडले पाहिजे : डॉ. झंवर

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**बुलडाणा :** येथील अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेच्या वतीने शनिवारी इयत्ता दहावी, बारावी, निट, एमपीएससी, यूपीएससी व सामाजिक क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार समारंभ बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी क्लब मलकापूर रोड बुलडाणा येथे पार पडला, या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ सुकेशजी झंवर होते ते बोलतांना म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांनी केलेल्या चमकदार कामगिरीमुळे आज आपला सत्कार होत आहे, हेच गुणवंत विद्यार्थी उद्याचे उज्वल भविष्य आहे म्हणून या विद्यार्थ्यानी एक चांगले नागरिक म्हणून घडले पाहिजे असे डॉ. सुकेश झंवर म्हणाले, कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना जेष्ठ विचारवंत दैनिक लोकमंथनचे मुख्य संपादक डॉ अशोक सोनवणे, डॉ दिपक काटकर, डॉ दुर्गासींग जाधव, इंजि.डी टी शिपणे,लक्ष्मण घुमरे, प्रकाश डोंगरे,यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद सदोदीत कसोशीने प्रयत्न करत असते याच बरोबर कला, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम घेवून परिसरातील विविध क्षेत्रातील गुणवंतांना प्रोत्साहन देण्याचे काम वर्षभर सुरु असते.

या कार्यक्रमाला, बहुजन शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब कांबळे, जेष्ठ पत्रकार राजेंद्र काळे, डॉ. जितेंद्र ओव्हाळ,वनपरिक्षेत्र अधिकारी राजेश शीपे, अशोक पसरटे,के. एम. वैरी, भास्कर चंदोरे, मानसिंग पुर्भे यांची प्रमुख उपस्थिती होती, प्रास्ताविक इंजि.डी.टी.शिपने, सूत्रसंचलन रोहित म्हस्के,आभार मुख्य आयोजक पुरूषोत्तम बोर्डे यांनी मानले, यशस्वीतेसाठी पुरुषोत्तम बोर्डे,शरद खरात,ॲड.गुणवंत नाटेकर, ॲड. प्रविण सुरडकर,डॉ बबन परमेश्वर,कैलाश उतपूरे, प्रमोद माळी, भिमसिंग शिंगणे आदींनी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र Business Katta












# इतिहासातून वाद नाही तर बोध शोधायचा असतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जशी आपली दृष्टी असते तशी आपल्याला सृष्टी जाणवते दिसते हे अगदी सत्य आहे. वातावरण निर्मिती करून सनसनाटी निर्माण करत चुकीच्या पद्धतीने मांडणी करून स्वतःच व्यक्तिमत्त्व लोकांच्या नजरेस आणणं हा जरी संवग लोकप्रियतेचा एक भाग असला तरी पण हा प्रकार म्हणजे फार फार क्षणिक समाधान प्रकार ठरू शकतो. यामधून फार काही साध्य होत नसतं. कारण याचा पाया मजबूत नाही. जिथे पाया मजबूत नाही तिथे इमारत भक्कम कशी असेल म्हणून ही पद्धत अथवा प्रकार म्हणजे वैचारिकता ठरत नाही.**

मान्य करण अथवा न करण हा व्यक्तिगत प्रश्न असतो. वैचारिकता हि विराट असते .सत्य शोधण सत्याचा वेध घेणं आणि घटनेतील घडामोडी मधील बोध शोधण म्हणजे वैचारिकता असते.एखादा विषय चुकीच्या पद्धतीने मांडणी करून सार्वजनिक करणं अथवा वास्तव सत्य शोधून बोध पुर्ण मांडणी करणं हा ज्याचा त्याचा व्यक्तिगत तथा व्यक्तिस्वातंत्र्याचा त्याच बरोबर दृष्टीचा भाग आहे अधिकार आहे. लोकांनी काय स्वीकारलं पाहिजे हे महत्वाचं आहे. लोक चुकिच स्वीकारत असल्याने चुकीच्या पद्धतीने मांडणी होतेय असंच काहीसं चित्र साध्य दिसतं आहे. ज्यावेळी सर्वसामान्य लोक जागृत होतील आणि सत्य स्वीकारतील त्यावेळी असत्य आपोआप मागे पडेल या मध्ये शंका नाही.इतिहास हा नेहमीच विचारवंत जन्मला घालत असतो. कारण सत्य शोधण्यासाठी बुद्धीचा कस लागतो. इतिहास हा बोध शोधून पुढे जाण्यासाठी असतो पण हल्ली बोध शोधण्या ऐवजी इतिहासावर वाद कसा निर्माण करता येईल हाच खास आणि विशेष प्रयत्न होताना दिसतो आहे. हा वाद निर्माण करणं खरंच गरजेचं आणि हितार्थ आहे का ? तर वास्तविक विचार केला तर हे अजिबात हितार्थ नाही. इतिहासाची सोनेरी पानं हि नवीन पिढीसाठी दिशा दर्शक बोध घेण्यासाठी असतात.ऐतिहासिक घटना कोणतीही असो कशीही असो ती त्या वेळेच प्रतिक असते. प्रत्येक घटनेत एक बोध लपलेला दडलेला असतो .तो बोध शोधणारा जाणकार असतो. इतिहासातील ऐतिहासिक घटना या मध्ये जो काही वास्तविक बोध दडलेला असतो. तो मुख्य बोध हेरता आला पाहिजे. घटना कोणतीही असु द्या त्या मध्ये जीवनबदलणारा घडवणारा बोध हा नक्कीच असतोच. पण आपण बोध शोधण्या ऐवजी त्या मध्ये वाद शोधतो आणि त्या वरून वाद कसा निर्माण होईल हाच मुख्य प्रयत्न करतो म्हणून इतिहासाची उपलब्धी ज्यामध्ये बोध मिळणार आहे त्यापासून आपण वंचित राहतो.आणि आपले समर्थक हितचिंतक आणि आपल्याशी जोडलेल्या संबंधीतांना देखिल वंचित ठेवतो. सत्य वास्तव हे समाज घडवणार असतं पण आजकाल सत्य घडविण्यासाठी फार प्रयत्न होत नाहीत. सत्य शोधण्यासाठी खुप कष्ट घ्यावे लागतात ही कष्ट घेण्याची सवय दिवसेंदिवस लुप्त होत चालल्याने सत्यापासून दूर राहण्यास जास्त पसंती आहे. असत्य सहज उपलब्ध असतं त्यासाठी फार काही यत्न, प्रयत्न करावे लागत नाहीत म्हणून असत्याला मोठी पसंती मिळताना दिसत आहे. पण खरया अर्थाने त्यामधुन होणारा लाभ हा शुन्य असतो . प्रबोधन हे जागृती साठी असतं . प्रबोधन सत्य शाश्वत असेल तर होश जागृती निर्माण होते .आणि उलटपक्षी असत्य पाया असेल तर सगळीकडे बेहोशी निर्माण होईल.मग बहोशी असताना काय घडेल अथवा बहोशी हि कधीच हितकारक नसल्याने अंतिमतः निरूपयोगी ठरेल. या मध्ये मग नेमका दोष कोणाचा आहे याचा विचार केला तर आपण चुकीचं पचवतो म्हणून आपल्याला ते त्या पद्धतीने खाऊ घातलं जातं ज्या दिवशी आपण चुकीचं पचवणार नाही त्या दिवशी पासून चुकीचं खाऊ घालणं आपोआप बंद होईल. वैचारिक प्रगल्भता विवेकशील वृत्ती आणि जागृत अवस्था हि सदैव क्षणोक्षणी असली पाहिजे. आपली जागृती हिच महत्वपूर्ण आहे.आपण जागृत असु तर असत्य आपोआप गायब होईल आणि जितकं सत्य आहे तेच समोर येईल आणि सत्य समोर आल्यावर त्यापासून आपला उत्कर्ष नक्कीच होईल. वास्तविक असत्य हे कोणासाठी हि लाभदायी नसतं. ते क्षणिक असल्याने भ्रमक, आकर्षक, सुंदर भासत पण शेवटी ते तसं नसतं म्हणून सत्य स्वीकारलं पाहिजे. इतिहास हा कसाही असला तरी त्या मधील बोध शोधुन तो स्वीकारण्यासाठी असतो. म्हणून त्यामध्ये मिळणारा बोध हा आपल्या जीवनात जीवन हितार्थ असतो. पण आपण हितार्थ बोध घेण्या ऐवजी चुकीच्या पद्धतीने मांडणी करून त्या मध्ये वाद शोधतो . इतिहासात बोध शोधला तर निश्चितच लाभ होईल आणि वाद शोधला तर हानी निश्चित आहे. काय शोधायचं काय घेयच हे आपल्याला समजलं पाहिजे.

# आठवणीतली गृहभेट



माधव आरुणराव डाके
संपर्क क्र. 9730115620

आधुनिक केसरी

**शाळा उघडून आता जवळजवळ सव्वा महिना लोटला होता. मुले आता शाळेत रमली होती. शिक्षक ही स्थिरावले होते. शाळेतून टीसी जाणे आणि शाळेत नवीन टीसी येणे ही प्रक्रिया ही आता मंदावली होती. विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना आता प्रथम घटक चाचणीचे वेध लागले होते. यावर्षी जूनमध्ये पाऊस न झाल्याने जूनचा पंधरवाडा उकाड्यातच गेला होता.**

आधुनिक केसरी

जूनमध्ये दरवर्षी विद्यार्थी उपस्थिती ही जरा बेताचीच असते. जुलैमध्ये मात्र वर्ग गजबजून जातात. चालू जुलै महिन्यात आता सर्व वर्ग तुडुंब भरलेले होते. शिक्षक शिकवण्यात आणि विद्यार्थी शिकण्यात रमून गेलेले होते. चालू शैक्षणिक वर्षाची सुरुवात अगदी सुरळीत झाली होती.;पण शाळेतील प्रत्येक वर्गातील काही विद्यार्थी अजूनही शाळेत नियमित येत नव्हती. काही विद्यार्थी बेशिस्तपणे वागत होते, काही विद्यार्थी अभ्यासात गंभीर नव्हते, तर काही जाणीवपूर्वक वर्ग शिस्त मोडून गोंधळ घालण्याचा प्रयत्न करत होते. अशा सर्व विद्यार्थ्यांच्या घरी गृहभेटी घेऊन त्यांच्या पालकांकडे तक्रारीचा पाढा वाचण्यासाठी, त्यांची प्रगती, अधोगती आणि सध्याची अभ्यासाची स्थिती पालकांच्या कानावर घालण्यासाठी, मुख्याध्यापकांच्या सूचनेनुसार एका शनिवारी शाळा सुटल्यानंतर आम्ही शिक्षक गृह भेटीसाठी निघालो. या वर्षी जुलै महिन्यात बऱ्यापैकी पाऊस झाल्यामुळे वातावरणात गारवा होता. आज आकाशात काळे ढग जमू लागले होते. वारा भरभर वाहत होता. वाहणारा वारा कानात शिरत होता. अंगावरच्या कपड्यांना डोक्यावरच्या केसांना स्पर्शून जात होता. वाऱ्यामुळे डोक्यावरचे केस विस्कटले जात होते. माझ्या काही महिला सहकाऱ्यांसमवेत मी पायी चालत शाळेच्या मागच्या बाजूस असणाऱ्या स्नेहनगर भागात गृह भेटीसाठी आम्ही निघालो होतो. सकाळची आकारा ची वेळ असल्याने पालक घरी भेटतील की नाही हा विचार आमच्या मनात घोळत होता. आम्ही उचलत्या पावलाने पालक भेटीसाठी निघालो होतो. रस्त्यात येणारे जाणारे अनेक परिचित लोक नमस्कार करून जात येत होते. कोणी जवळ थांबून आमच्या हातातल्या नोंदवह्या पाहून आस्थेवाईक विचारपूस करत होता.

सर कुठे ?" आम्ही त्यांना सांगत होतो ,की, "काही नाही विद्यार्थी गृह भेटीसाठी निघालो आहोत. अच्छा, ठीक आहे." असं म्हणून ते पुढे सरसावत होते. आम्ही स्नेहनगर मध्ये पोहोचताच आमचे काही आजी माजी विद्यार्थ्यांनी आमच्याजवळ कोंडावळ केलं.आम्हाला मोठ्या आस्तेवाईकपणे आमच्या येण्याचं कारण ते विद्यार्थी विचारू लागले. आम्ही 'विद्यार्थी गृहभेटीचे ' कारण देताच " सर मॅडम चला मी तुम्हाला अमुकचं घर दाखवतो, तमुकचं घर दाखवतो" म्हणून आमच्या सोबत येऊ लागले. आम्ही " धन्यवाद आवश्यकता नाही. आम्ही जातो." असं म्हणत त्या विद्यार्थ्यांचे आभार मानत आम्ही पुढे निघालो.

रस्त्याच्या कडेला एका घराच्या समोरच एक वृद्ध आजी बसलेल्या दिसल्या. ते घर आमच्या शाळेतील एका विद्यार्थ्याचे होते; जो वारंवार शाळेला अनुपस्थित राहत होता. त्या विद्यार्थ्या बाबत आजींकडे विचारणा करताच अगदी हातबलपणे आजींनी बोलायला सुरुवात केली, सर,मॅडम... मी आता थकून गेली आहे. त्याचे आई वडील सकाळीच कामावर जातात. संध्याकाळी उशिरा परत येतात. तो माझे काहीच ऐकत नाही. दिवसभर कुठे फिरतो तेच कळत नाही. तुमचा निरोप मी त्याच्या आईवडिलांपर्यंत कळवते. आणि त्यांना शाळेत पाठवते.

आजींनी सारं काही एका दमातच सांगून टाकलं. माझी नजर घराकडे वळली. त्या विद्यार्थ्याचे घर अगदीच



साधे होते.घरावर पत्रे होते. घराचा पुढचा दरवाजा अगदी खुजा होता. घरात सर्वत्र अंधार दिसत होता. आमचा तो विद्यार्थी कुठे दिसतो का हे पाहण्यासाठी आम्हा शिक्षकांच्या नजरा आजूबाजूस भिरभिरत होत्या. परंतु तो तिथे कुठेच दिसत नव्हता. आजीचा निरोप घेऊन आम्ही पुढे निघालो. दुसऱ्या एका गल्लीत आलो. आम्ही आल्याची बातमी आता विद्यार्थ्यांमध्ये वाऱ्यासरखी पसरली होती.आजी-माजी विद्यार्थी आमच्या भोवती जमा होत होते.ते जमा झालेले विद्यार्थी पाहून रस्त्याने ये - जा करणारे लोक आमच्याकडे उगाच थांबून पाहत होते. त्यांचे आमच्याकडचे असे पाहणे पाहून, आम्हाला कसेसेच होत होते. आम्ही विद्यार्थ्यांना दूर पांगवत होतो. विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन विद्यार्थी शाळेला न येण्याची कारणे जाणून घेत होतो.शाळेत बेशिस्त वागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा पाढा पालकांसमोर वाचून दाखवत होतो. आपल्या पाल्यांच्या तक्रारी ऐकून पालकांचा चेहरा उदास होत होता. मुल हाताबाहेर जात असल्याची खंत आणि उद्वेग सुद्धा अनेक पालक आमच्याशी बोलून दाखवत होते. बहुतांशी विद्यार्थ्यांचे पालक अत्यंत गरीब असून, शहरात कुठल्यातरी दुकानावर काम करणे, बांधकाम मजूर म्हणून मिस्त्रीच्या हाताखाली जाणे, रिक्षा चालवणे, धुणी भांडी करणाऱ्या महिला पालक, कबाडकष्ट करून दिवसा मागे दिवस ढकलणारे पालक आणि त्यांच्या वेदना व आपल्या पाल्या विषयीच्या संवेदना पाहताना, त्यांचा दैनंदिन जीवन संघर्ष अनुभवताना, आम्हा शिक्षकांचे डोळे पाणावले होते. मन हेलावले होते. विद्यार्थ्यांचं हे किशोर वयच असं असतं. जीवनाला घडवणारं, जीवनाला आकार देणारं, तर कधी निसरड्या जीवन रस्त्यावरून न कळत घसरणारं, या रस्त्याने चालताना वेळीच सावध होऊन आपल्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार डोळ्यासमोर ठेवून, सतत दक्ष राहून पाऊलं टाकली तर आई-वडिलांच्या कबाडकष्टाची चीज होईल. आणि याच शिकण्याच्या वयात आपल्या इच्छित ध्येया पासून विद्यार्थी दुरावला तर मग, पुढे अंधारच...अंधार.... आम्ही घरोघरी जाऊन पाल्याविषयी आमची मतं मांडत होतो. पालकांची आमच्या विषयी शाळे विषयी मतं जाणून घेत होतो. पालकांच्या आमच्या कडून असणाऱ्या अपेक्षा जाणून घेत होतो. कुठे विद्यार्थ्यांच्या तक्रारी करत होतो; तर कुठे विद्यार्थ्यांचे कौतुकही करत होतो. प्रत्येक शाळेत असे काही विद्यार्थी असतातच जे पुढे चालून शिक्षकांचे, शाळेचे, संस्थेचे व पालकांचे नाव उंचावतात. अशा अभ्यासू, गुणी, विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुकही आम्ही पालकांशी संवाद साधताना करत होतो. गृहभेटी करत आम्ही आता सुभाष रोड पार करून सुभाष रोडच्या दक्षिण भागातील एका कॉलनीत प्रवेशित झालो. कॉलनी कसली चाळच म्हणावी ती. **क्रमशः**

# ना.धों. महानोर यांच्या कवितेतील रानावनात विरलेली स्त्री




किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**मी रात टाकली, मी कात टाकली। मी मुडक्या संसाराची बाई लाज टाकली। ज्या संसारांमध्ये तिचे मन रमत नाही, तिच्या कोणत्याही गरजा पूर्ण होत नाहीत त्या संसाराला निरोप देताना तिला लाज वाटत नाही अशी बिनधास्त, सडेतोड स्त्री महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी ना धों महानोर यांच्या गीतांमधून आपल्याला भेटते. अठरा विश्व दारिद्र्य, धड खायला नाही धड ल्यायला नाही. मानसिक समाधान नाही, भावनिक आणि शारीरिक समाधान सुद्धा मिळत नाही मग अशावेळी असा संसार सोडताना कशाची तमा बाळगावी? असा विचार करून महानोरांच्या कवितेमधील स्त्री पुढे म्हणते, ह्या पंखांवरती, मी नभ पांघरती।मी मुक्त मोरनी बाई, चांदन्यात न्हाती।**

आधुनिक केसरी

जर स्त्रीच्या पंखामध्ये आकाश पांघरण्या इतकी शक्ती आहे, तिचे जीवन, तिचे मन मुक्त मोरनी सारखे स्वातंत्र्यप्रिय आहे मग तिने चांदण्यात



फिरण्याचा आनंद घ्यावा की बंधनात आनंद मानावा ? अर्थात मुक्त मोरनी बंधनांमध्ये सुखी राहू शकत नाही, मग तो बंधनात टाकणारा मोडका संसार सोडण्याबद्दल विचार करायचा सरळ विचार महानोरांच्या कवितेतील नायिका व्यक्त करते. शुभ्र काचेत पारा, तसा संग साजुरा हिरव्या आषाढ वनात डांगोरा, कसा पाण्यात लाविला अंगारा जरा बांध गजरा, माझी आण शाहीरा नव्या फुलून आलेल्या संसारा, माझ्या घराला सोन्याचा उंबरा. खरेतर कोणत्याही स्त्रीचे संसाराबद्दल चे स्वप्न घराला सोन्याचा उंबरा म्हणजेच भरभराट आणि चैतन्य यांनी बहरून आलेला दोन जिवांचा मेळ इतका साधा सोपा अर्थ मनात ठेवून स्त्री संसाराकडे पाहत असते. रानकवी म्हणून ओळख असणाऱ्या ना धों महानोर यांचा जन्म 16 सप्टेंबर 1942 रोजीमहाराष्ट्रातल्या वर्तमानऔरंगाबाद जिल्ह्यातीलपळसखेडया गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षणपळसखेड, पिंपळगाव, शेंदुर्णीयेथे झाले. त्यानंतरजळगावातीलमहाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला; मात्र महाविद्यालयीन शिक्षण सोडून शेती करायला ते आपल्या गावी परतले मराठी साहित्यविश्वात ते रानकवी म्हणून प्रसिद्ध आहेत. महानोरांच्या कवितेमधून स्त्रीची विविध रूपे अविष्कृत झालेली दिसतात. त्यांच्या एकंदर सर्वच काव्याचा विचार केला असता त्यात येणाऱ्या स्त्रिया वेगवेगळ्या रूपात वाचकांना भेटते. जीवनातील बिकट परिस्थितीला सामोरे जाताना संसाराचा गाडा ओढणारी, कधी उदास झालेली तर कधी भ्रमिष्ट झालेली आपल्या सुख दुःखासह आपल्या अवतीभवती वावरणारी स्त्री ना धों महानोर आपल्या कवितेमधून रेखाटली आहे. पीठ गळे जात्यातून तसं पाणी डोळ्यातून, आई करपले हात तुझे भाकरी भाजून. या अतिशय साध्या आणि सोप्या शब्दांमधून आई या रुपामध्ये स्त्रीचे संपूर्ण आयुष्य नेमके कोणत्या पद्धतीने जाते याची जाणीव कवीने करून दिलेली आहे.

**आईचे दुःख डोळाभर पाणी दाटली कहाणी आयुष्याची ।।**
**जात्याच्या ओवीचा संपला वेदांत देव्हाऱ्यात वात करपली ।।**

या अभंगांमध्ये आई गेल्यावर कवीच्या मनामध्ये दाटून आलेले दुःख आणि जात्याचा आणि ओवीचा वेदांत संपल्याची भावना घरामध्ये आई गेल्यानंतर जमा होणाऱ्या उदास वातावरणाची प्रकर्षाने जाणीव करून देणारी आहे यात शंका नाही. त्यातही कवी जेव्हा

**आमच्या संसारी, घोटाळो न मन ।तिथे तरी प्राण ।शांत राहो ।।**

असे म्हणतात तेव्हा आई मेली तरी आपल्या मुलाची काळजी करणे सोडत नाही, तिचा आत्मा किंवा मन सतत मुलांच्या संसारामध्ये किंवा घरामध्ये घुटमळत फिरत राहते अशी भावना कवीने व्यक्त केली आहे. महानोरांच्या कवितेमध्ये शेतात वावरणारी, राबणारी कष्टनारी निसर्गाच्या कुशीमध्ये स्वतःचे अस्तित्व उडवून देणारी आई सातत्याने दिसत राहते. जसे जीवनाची टांगा टोली किती सोसू कशी सोसू डोळे झाकून पापण्या आता उरले न आसू अशा शब्दांमध्ये तिच्या दुःख भोगण्याचा आणि सहन करण्याच्या जाणिवा महानोरांनी शब्दांकित केल्या आहेत. आई अपरात्री उठायची आणि जात्यावर बसायची फाटक्या लुगड्याला गाठी बांधून अंग झाकून घ्यायची. तिला वाट्टेल त्या रात्री जात्यावर बसायची जुन्याच ओव्यांचे दारिद्र पांघरायची लक्तरा सारखी... तत्कालीन स्त्रीच्या आयुष्यातील जाते, ओव्या, आणि कष्ट हे जणू तिच्या पाचवीला पुंजल्या सारखे जीवनाचा अविभाज्य घटक होऊन बसले होते. बरे एवढे कष्ट करून ही माय माऊली साऱ्यांच्या सुखात, घरादाराच्या दुःखात स्वतःला झिजवून घेत असताना स्वतःला कायमच अर्धपोटी ठेवून झोपते ते सांगताना कवी म्हणतात, माय दळताना तुझे डोळे गळले जात्यात आणि ओंजळीचे आणि हात पीठ भरल्या सुपात. भाजी-भाकरीचा घास भरवला साऱ्यांसाठी आणि सांजेला झोपली एकटीच अर्धपोटी ... अगदीच जात्यात आयुष्य भरडुन काढावे आणि जणू पीठ होऊन कृतार्थ व्हावे असेच आयुष्य ग्रामीण भागातील माय माऊली यांचे जीवन पाहताना कवीला आढळून आले आहे आणि त्यांनी ते आपल्या कवितेतून सजीव केले आहे.


**कोन्या राजानं राजानं शेवडी खंदली न कोन्या रानीनं रानीनं पानीच भरलं कोन्या राजाच्या राजाच्या डोल्यांत भरली न कोन्या रानीला रानीला दीठच लागली हा पाय शेनाचा, हा पाय मेनाचा।**

**बंधुनं बायको केली माय पदर सोन्याचा** लग्नकार्यात म्हणायचं गाण्या मधील नेमका ठेका, लयबद्धता, आणि प्रासंगिक कथा असा सुंदर आविष्कार वरील गीतामध्ये महानोरांनी उभा केला आहे. यामध्ये राणीला दिठ लागणे, राणीने पाणी भरले ह्या अत्यंत स्त्रीसुलभ घटना कवीने नेमकेपणाने टिपल्या आहेत. त्यातही स्त्रीने आपल्या माहेरच्या लोकांना नेहमीच भरभरून कोडकौतुक केलेले ग्रामीण भागांमध्ये दिसते, त्याचाच एक भाग म्हणजे पाय शेणाचा असो की मेणाचा असो म्हणजे परिस्थिती कशीही असो पण स्त्रीच्या भावाने केलेली बायको म्हणजे जगातील सर्वात सुंदर असेच तिचे मत असते. तिचा पदर सोन्याचा असतो म्हणजेच आपल्या भावाकडे भरभरून संपत्ती आहे असा स्त्रीसुलभ बडेजाव प्रत्येक स्त्री करत असते ते महानोरांनी दाखवून दिले आहे. असे असले तरी स्त्रीच्या सहनशीलतेला अंत नाही, दुःखाच्या आणि कष्टाच्या वाटा सतत पुढे सरकत जातात त्या ती कुठे तक्रार करत नाही. बाई जन्माचे धिंदोडे सांगू कसे, झाकू कसे ? चुलीतल्या गोवरीला चुलीमंधी जळायचे! इतक्या सोशिक विचाराने न धो महानोर यांच्या कवितेमधील स्त्री आपल्या भावना आणि वेदना मांडत असते. ती हे सर्व का सहन करते ? अशा प्रश्नाची अनेक उत्तरे तिची कहाणी यासारख्या काव्यसंग्रहा मधून मिळतात. ती दररोज ओवी गाते सूर्यासाठी संसारातल्या सुखदुःखासाठी प्रकाश मागते अंधाऱ्या कडा पुसून टाकण्यासाठी... अशा उद्याच्या स्वप्नासाठी किती हे सर्व सहन करणे सुरू असते. पुरुषप्रधान व्यवस्थे मध्ये निमूटपणे सोसावे लागणारे अत्याचार, दारिद्र्य, जीवाची होणारी तगमग या सर्वांमध्ये एखादेवेळी अन्यायाविरुद्ध उभे राहाणे हे सारे महानोरांच्या कवितांमध्ये दिसून येते. व्यसनी पतीमुळे रोजची अमानवीय मारहाण सहन करणारी एखादी स्त्री काळीज चिरून ठेवणारा प्रश्न विचारते, माय बापहो मी कोणत्या रस्त्यावर राहू ? या लहानग्या चिमण्यांना मी कसे काय सांभाळू ? घरदार असून घर पाठीशी लागलेल कुठल्या काळातलं पाप माझ्या नशिबी आलेल.. आपल्या समाजव्यवस्थेमध्ये व्यसनापायी पुरुषाच्या पुरुषार्थ साठी स्त्रीवर होणारे अमानवीय हल्ले आपण सतत पाहत असतो, व्यसन करणारे व्यसन करतात पण त्याचा त्रास स्त्रियांना होतो याचा कोणी विचार करत नाही. त्याची जाणीव महानोरांच्या कवितेमध्ये स्त्री आपल्याला करून देते. **क्रमशः**

# आ. संजय रायमूलकर : संघर्षाच्या वाटेवरील वाटसरू

आधुनिक केसरी

**मुझे उंचाईयो पर देखकर हैराण है बहुत लोग. पर किसीं ने मेरे पैरो के छाले नही देखे कुठलीही व्यक्ती मोठ्या स्थानावर जाऊन पोहचली की त्याचं तिथपर्यंत जाणं अनेकांना रुचणारे असते तर कित्येकांना ते बोचणारे देखील असते. मात्र वर्तमान स्थानांपर्यंत पोहचण्यासाठी त्या व्यक्तीला काय काय दिव्यत्व प्राप्त करावे लागते याची कल्पना कुणाला नसल्याने उपरोक्त ओळी मला आपसूकच आठवल्या. आमदार संजय रायमूलकर, मेहकर विधानसभा मतदारसंघाचे तिसऱ्यांदा प्रतिनिधित्व करत आहेत. राज्यमंत्री पदाचा दर्जा असलेल्या विधी मंडळाच्या पंचायत राज या महत्वपूर्ण समितीचे प्रमुख. आज त्यांचा वाढदिवस.**




सिद्धेश्वर राणा पवार
संपर्क क्र.: 9422880080

तिसऱ्यांदा आमदार असलेल्या आ संजय रायमूलकर यांना आता आयुष्यात मागे वळून बघण्याचं काहीही काम नाही.मात्र तरी देखील आ संजय रायमूलकर सारख्या अतिशय सामान्य कुटुंबातील आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या मुलाने इथवरचा केलेला प्रवास वाटतो तितका सोपा नाही.

रायमूलकर परिवाराशी आमचे पूर्वापार संबंध.आ संजय रायमूलकर यांचे वडील सेवानिवृत्त शिक्षक भास्करराव रायमूलकर हे माझे वडील स्व रा ना पवार यांचे ब्रम्हपुरी जिप शाळेचे विद्यार्थी. असे असले तरीही व्यक्तिशः मी त्यांना १९८७ पासून ओळखतो. हिंदुहृदयसम्राट स्व बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचाराने तरुणाई त्याकाळी भारावून गेलेली.८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण ह्याच तत्वावर शिवसेना आपलं राजकारण करत असल्याने त्यावेळी गावागावात लग्नसमारंभात देखील गळ्यात भगवा रुमाल घालून पंक्तीत वाढण्यापासून तर पत्रावळी उचलणे आणि फळ भरून नवरी वाटी लावण्यापर्यंतचा सक्रिय सहभाग शिवसैनिकांचा असायचा.

साध्या साध्या कामापासून तर कुणावर अन्याय झाला तर त्याच्यासाठी धावून जाण्याची भूमिका शिवसैनिकांची असायची असा तो मंतरलेला काळ आणि त्याच काळात ठेंगणासा,बारीक शरीरयष्टी च्या संजय रायमूलकर नावाच्या कडव्या शिवसैनिकाने हिवरा आश्रम- देऊळगाव माळी परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती.

कुठल्याही पदाची अपेक्षा न करता तत्कालीन शिवसेना जिल्हाप्रमुख स्व दिलीपराव रहाटे,विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांचा कडवा शिवसैनिक म्हणून शिवसेनेसाठी स्वतःला झोकून देत आ संजय रायमूलकर यांनी न थकता काम केले. शिवसेनेचा रस्ता रोको असो,की बायपास रस्त्यासाठीचे छेडलेले आंदोलन असो.गत कित्येक वर्षापासूनचा पेन टाकळी च्या पाझरणाऱ्या कालव्या साठीचे केलेले उपोषण असो.रक्तारक्तात अन्यायाविरुद्ध आणि सर्वसामान्यांच्या मागण्यासाठी स्वतःला झोकून देण्याच्या स्वभावामुळे तिसऱ्यांदा सत्ताधारी आमदार असतांना देखील पेन टाकळी प्रकल्पाच्या पाण्यात उडी मारून स्वतःचा जीव धोक्यात घालून आंदोलन करणाऱ्या या हाडाचा शिवसैनिकांने मेहकर मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलवून टाकला आहे. शिवसेना शाखा प्रमुख,देऊळगाव माळी शिवसेना विभाग प्रमुख,शिवसेना तालुका प्रमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती, नंतर सभापती आणि मेहकर मतदारसंघ राखीव होताच मेहकर मतदारसंघाचे सलग तिसऱ्यांदा आमदार,पंचायतराज समितीचे प्रमुख असा इथपर्यंत चा प्रवास अनेक खस्ता खात त्यांनी पार केला आहे.

शिवसेनेच्या शाखा गावोगावी वाढल्या पाहिजे यासाठीची खा प्रतापराव जाधव यांच्या धडपडीला ज्या शिवसैनिकांनी मूर्त स्वरूप दिले त्या यादीत आ संजय रायमूलकर यांचे नाव अग्रस्थानावर येते. रात्री बेरात्री नांद्रा धांडे फाट्यावरून पायी पायी घरी जायचे.



कधी रात्री एक नंतर तर कधी मध्यरात्र उलटल्यावर पोटाची आणि भाकरीची भेट व्हायची
कधी कडाक्याच्या थंडीत तर कधी कोसळणाऱ्या पावसात घर गाठायचं आणि दुसऱ्या दिवशी सूर्याचे दर्शन होण्यापूर्वीच घर सोडायच एव्हडी मेहनत शिवसेनेसाठी घेणारा शिवसैनिक मी अनेकदा टिपला आहे.त्यांच्या ह्या रात्री बेरात्रीच्या प्रवासातला मी एक साक्षीदार असल्याने त्यांचा हा खडतर प्रवास मी स्वतः अनुभवलेला आहे.

सन २००० ते २००३ या तीन वर्षांत मेहकर येथून घरी परत जाण्याचा प्रवास आम्ही सोबत केलेला असल्याने रात्री बेरात्री डोंगर पट्ट्यातून न थकता उत्साह कायम ठेवत दुसऱ्या दिवशी सकाळीच मेहकरात हजर व्हायचं या विचाराने रात्री घराची वाट पकडणारा एकनिष्ठ शिवसैनिक मी स्वतः अनुभवलेला आहे.

तिसऱ्यादा आमदार म्हणून काम करत असतांना अभिमानाने,गर्वाने कधी या माणसाला शिवले नाही. सर्वसामान्य लोकांशी असलेली नाळ कधी त्यांनी तुटू दिली नाही.खासदार जाधव आणि जाधव कुटुंबियांचा मानसपुत्र म्हणून त्यांच्या विषयी असलेल्या निष्ठेला कधी त्यांनी तडा जाऊ दिला नाही.आपले पाय जमिनीत घट्ट रोवून ठेवल्यामुळेच आज देखील मतदारांच्या मनात त्यांची प्रतिमा आपला संजू अशीच असल्याने केवळ शिवसेनेचेच नव्हे तर सर्वच पक्षातील लोकं सतत त्यांना पाठबळ देत राहतात. त्यांच्या मध्ये असलेली विनयशीलता- निगर्वीपणा हीच त्यांच्या समाजकारणाची व राजकारणाची खरी शक्ती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही अशा जमिनीवर पाय असलेल्या लोकनेत्याचा आज वाढदिवस त्यानिमित्ताने त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा उदंड आयुष्य लाभो तुम्हां, घडो निरंतर समाजसेवा तुम्हांसाठी हृदयी अमुच्या, लक्ष लक्ष शुभेच्छांचा ठेवा.

# आदरांजली...

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी, गीतकार ना.धों.महानोर यांचे आज निधन झाले. रानातील कवी अशी ख्याती असलेले निसर्ग कवी म्हणून ते लोकप्रिय होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. याच विषयी मान्यवरांनी आधुनिक केसरीसाठी जागवलेल्या खास आठवणी वाचकांसाठी...**

## ऋणानुबंध हरपला...

ना. धों. महानोर यांच्या निधनाची बातमी कळली आणि गेली कित्येक वर्ष त्यांचा असलेला ऋणानुबंध डोळ्यासमोर उभा राहिला. मराठी कवितेला विशेषतः ग्रामीण, शेतीभाताच्या, रानाफुलांच्या कविता व इतर लेखन लोकप्रिय झाले त्यात महानोर यांचा मोठा वाटा आणि सहभागही आहे तो कायम राहील.

अंबाजोगाईच्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात कवी म्हणून अनेकदा व उद्घाटक म्हणून ते आले. माझे चुलते स्व. भगवानराव लोमटे बापू हे महानोर यांच्या कवितेचे आस्वादक होते. त्यांना महानोर यांच्या कविता तोंडपाठ होत्या. त्यामुळे बापूंचे आणि महानोर यांचे घनिष्ठ संबंध होते. मी साहित्य चळवळीत सक्रिय झालो आणि महानोर यांना भेटण्याचा, कविता, भाषणे ऐकण्याचा अनेकदा प्रसंग आला. अंबाजोगाई मला खूप आवडते असे नेहमी म्हणायचे. म्हणून३९ वे मराठवाडा साहित्य संमेलन अंबाजोगाईत पार पडले त्याचे उद्घाटन त्यांच्या हस्ते ठरले होते. ते अंबाजोगाईत आले पण. इथे पोहंचले आणि त्यांच्या बंधूंच्या निधनाची बातमी आली आणि त्यांना परत जावे लागले.

मराठवाडा साहित्य परिषदेचे ते आधारस्तंभ होते. मागच्या परिषदेच्या निवडणुकीत ठाले पाटील यांच्या नेतृत्वात कार्यकारी मंडळ निवडून आल्यावर जालना येथे सर्वांचा सत्कार करण्यात आला. माझ्या सत्काराच्या वेळी त्यांनी आवर्जून विचारपूस केली. त्यानंतर बापूंचे निधन झाले आणि त्यांच्या नावाचा राज्यस्तरीय पुरस्कार आम्ही चालू केला. दुसऱ्याच पुरस्कार त्यांना डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते दिला. पटेल आणि महानोर ही जोडी प्रसिद्ध होती त्यामुळे सभागृह खच्चाखच भरलेलं होते. त्यावेळी दोघांच्या भाषणांची जुगलबंदी आजही आठवते. अनेक आठवणी, चित्रपट, राजकारण, शेती, साहित्य यावर सखोल अभ्यास असलेल्या महानोरांचे भाषण चिरकाल अंबाजोगाईकर यांच्या लक्षात राहील. त्यांची माझी शेवटची भेट मार्च महिन्यात नांदेड येथे शंकर दरबार साहित्य संमेलनात झाली. त्यांना शंकरराव चव्हाण जीवन गौरव पुरस्कार देण्यात आली. रात्रीच्या कविंसमेलनात माझे कविता वाचन होते. तेंव्हा आवर्जून माझे "राहून गेलेले पत्रे" हे पुस्तक भेट दिले. त्यांनी पुस्तक चाळून कौतुक केलं. जवळ घेवून यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह सातत्याने करता म्हणून जाहीर कौतुक केलं.

अलीकडे त्यांच्या पत्नी सुलोचना यांचे निधन झाले. ते एकाकी झाले. तेंव्हा पासून त्यांची तब्येत बरी नव्हती. तरी ते जमेल तसे फिरत राहिले. नांदेडहून परत गेल्यावर मला फोन केला आणि कांहीं पुस्तके तुला पाठवत आहे वाच. जून महिन्यात मला रजिस्टर पोष्टने पुस्तके मिळाली. त्यात त्यांच्या पत्नी सुलोचना यांच्या स्मृतींना उजाळा देणारे "सुलोचनेच्या पाऊलखुणा" हे पुस्तकही होते. वाचून त्यांना कळविले. इतक्या मोठ्या माणसांने माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याची आठवण ठेवून काळजी घेणे हा मोठेपणा त्यांनी जपला.

विलक्षण बुद्धिमत्ता, शेती विषयी निष्ठा आणि शेतिभातावर, रानफुला बरोबर माणसांच्या सुखदुःखाचे साहित्य त्यांनी लिहिले आणि त्यातील प्रश्नांना वाचा फोडली. त्यांची अनेक चित्रपट गीते लोकाभिमुख आहेत. ती कायम अजरामर आहेत.

त्यांचे निधन केवळ मृत्यू नाही त्यांच्या जाण्याने एक मोठी पोकळी निर्माण नक्कीच होणार आहे. ती भरून काढण्यासाठी पुन्हा एक महानोर जन्माला यावा लागेल. भावपूर्ण श्रद्धांजली!

***– दगडू लोमटे, लेखक, अंबाजोगाई.***

## मातीवर प्रेम करणारा कवी...

निसर्गात रममाण होऊन त्यात कविता शोधणारे चतुरस्र व्यक्तिमत्त्व, साहित्यिक, गीतकार ना.धों. महानोर यांचे दुःखद निधन चुटपुट लाऊन गेले. या सुप्रसिद्ध रान कवीने मराठी साहित्यावर अमीट मुद्रा उमटवत आपल्यातील जाणिवा सतत बहरत ठेवल्या. निसर्गातील अद्वितीय सशक्त भावनांना ते लडीवाळपणे मांडण्याचे कसब त्यांनी अंगीकृत केले. शांत, संयमी, आणि मृदू स्वभावाच्या ना.धों. महानोरांनी आपल्या प्रतिभेने वाचक- रसिकांना वेड लावले होते. त्यांनी निसर्गाच्या विविध छटा थुईथुई नाचणा-या मोरासारख्या शब्दबद्ध केल्या. त्या विविध छटांना शब्दशृंगाराचे कोंदन चढवित त्याचे नाविन्य जपण्याचे काम केले. कायम मातीशी जुळलेल्या या कवी,गीतकाराने विविधांगी साहित्य लेखन करून मराठी साहित्याला मौलिक विचार दिला. ते मातीवर प्रेम करणारे सच्चे नायक होते. लोकसाहित्याबददल त्यांना प्रचंड प्रेम आणि जिव्हाळा होता. त्या प्रेमापोटी आपल्या भागातील लोकगीते, लोककथा शोधून ते अजरामर करण्याचे भाग्य त्यांना लाभले. म्हणूनच भावनात्मक, मधाळ आणि विलक्षण प्रभावशाली राजस रुपाचे दर्शन घडविणारे...

**"राजसा जवळि जरा बसा
जीव हा पिसा तुम्हाविण बाई
कोणता करू शिणगार सांगा तरि काही...."**

हे सदैव आठवणी राहते. त्यांच्या अनेक आठवणी निसर्गाच्या सान्निध्यात आजही मधुर शिळ घालत आहेत. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन..!

***– बाळासाहेब जोगदंड, साहित्यिक, औरंगाबाद.***

## निर्मळ झ-याचा माणूस...

निसर्ग कवी ना. धो. महानोर यांच्या आठ गाण्यांचे ताल सूत्रसंचालन करण्याची मला संधी मिळाली. गाणी ऐकताना अगदी आपण स्टुडिओत नसून खरंच निसर्गाच्या सनिध्यात रेकॉर्डिंग करतोय असे वाटत होते. निसर्ग कवी ना. धो. महानोर यांचा स्वभाव शांत, आनंदी, आणि हिरवळी निसर्गासारखाच होता . आमच्याशी ते बोलताना बोलण्याची पद्धत म्हणजे असे वाटायचे की शांत निर्मळ झऱ्याच्या पाण्याचा आवाज आहे. खरंच एवढं निसर्गाबद्दल प्रेम आणि माहिती असणे म्हणजे कमालच वाटायची. आणि तेच प्रेम काव्यात, लिखाणात, शब्दात निसर्ग रेखाटण्यासारखे आहे. मला त्यांच्या अनेक लोकप्रिय गीतांना ढोलकीसह तालवाद्यांची साथसंगत करायची संधी मिळाली ती आठवण कधीही विसरता येणार नाही. आज निसर्ग कवी ना.धो. महानोर आपल्यात नाही याची खंत तर आहेच.,पण आज निसर्ग कवी निसर्गात विलीन झाला यावर विश्वास बसत नाही.

***– विजय चव्हाण
जगविख्यात तालवादक
मुंबई.***

## गोड शब्दांची साथ लाभलेला कवी...

आपल्या तरल काव्याच्या जोरावर काव्यप्रेमी मराठी वाचकांच्या मनात ना. धों. महानोर यांनी हक्काचं स्थान प्राप्त केलं होतं. महानोर यांनी काव्यसंग्रहांबरोबरच अनेक चित्रपटांसाठीही गीते लिहिली ती कायम स्मरणात राहतील. त्यांच्या या गीतांना त्यांच्या कवितांप्रमाणेच मराठी प्रेक्षकांची पसंती मिळाली हे खूप मोठे यश म्हणावे लागेल. आम्ही ठाकर ठाकर..., चिंब पावसानं रान झालं आबादानी.., नभ उतरू आलं..., जांबुळ पिकल्या झाडाखाली..., जाई जुईचा गंध, किती जीवाला राखायचं.., बाळगू कशाला व्यर्थ कुणाची भीती..., अशी एकाहून एक सरस गाणी ना.धों. महानोर यांनी लिहिली हे एक मराठी साहित्यातील वेगळे पर्व म्हणावे लागेल. महानोर यांनी आपल्या साहित्यात काहीवेळा मराठीच्या बोलीभाषांचा वापर केला. त्यांच्या कवितांनी बालकवी व बहिणाबाईंचा वारसा समृद्ध केला. ना.धों. महानोरांचे 'पानझड', 'तिची कहाणी', 'पळसखेडची गाणी' म्हणजे मराठवाडी लोकगीतांचा खजिना. रानातल्या कविता, पही, गांधारी ह्या त्यांच्या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाने पारितोषिके-पुरस्कार देऊन गौरविले.

"या नभाने या भुईला दान द्यावे आणि या मातीतुनी चैतन्य गावे अशी कोणती पुण्ये येती फळाला जोंधळ्याला चांदणे लखडुन जावे...." अशी आता त्यांच्या गोड शब्दांचीच साथ आहे.

***– प्रमोद कुलकर्णी, लेखक, बीड.***

## मृदू मनाचा निसर्ग कवी...

महाराष्ट्राला पडलेलं एक सुरेख निसर्गस्वप्न,तरल काव्यासाठी ओळखले जाणारे आणि मातीचा गंध गीतांतून देणारे अशी ज्यांची ओळख करून दिली जाते अशा ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी आज जगाचा निरोप घेतला आणि क्षणभर अस्वस्थ वाटले.

ना. धों. महानोर यांच्या 'रानातल्या कवितांमधून खरेच मातीचा गंध यायचा. निसर्गाची वर्णन करणारी जसी गीतं लिहिली, तशाच ठसकेबाज लावण्याही लिहिल्या. श्रावणातल्या उन्हाचा कोवळेपणा आणि स्त्रीचा नाजूकपणा एकत्रितपणे दर्शवणारी 'श्रावणाचं ऊन्ह मला झेपेना....' ही लावणी खूपच लोकप्रिय झाली. आजही ती रसिकांच्या ओठावर आल्याशिवाय राहत नाही. 'आम्ही ठाकर ठाकर,जांबुळ पिकल्या झाडाखाली.. ,नभ उतरू आलं...,चिंब पावसानं रान झालं आबादानी...' यासह अनेक गाणी रसिक मनावर आणि कर्णपटलावर रुंजी घालतात आणि ती गाणी स्मरणात राहतात. शेवटी मृदू मनाचा निसर्ग कवी म्हणून ते कायम स्मरणात राहतील.

**– वसंत राठोड, लेखक, मुंबई.**



**ना.धों. महानोर उर्फ नामदेव धोंडो महानोर**

संकलन
बाळासाहेब जोगदंड

**6 सप्टेंबर 1942– 3 ऑगस्ट 2023**



# लांडोर बंगला परिसरात वनभोजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या युगात माणूस माणसांमध्ये राहूनही माणूसपणापासून दूर झाला आहे. एकमेकांना भेटायला, बोलायला वेळ मिळत नाही. नातलगांशी संवाद होतोय पण तो प्रत्यक्ष नाही तर मोबाईलवर होतोय. मित्र मंडळी, सहकारी, आप्तेष्ट हे देखील मोबाईलच्या संपर्कानेच कनेक्ट होतात. फेस टु फेस संपर्क व्हिडिओ कॉलिंगनेच केला जातोय. काय हवे, काय नको, उठलात का, जेवलात का, झोपलात का, गुड मॉर्निंग, गुड नाईट, हॅप्पी बर्थ डे, हॅप्पी ॲनिव्हर्सरी, भावपूर्ण श्रध्दांजली हे सारं काही सोशल मीडिया वापरातूनच चालले आहे. माणूस माणसापासून हरवलाय असं देखील मोबाईलवरुनच वाचायला मिळत आहे. अशा या बिझी शेड्युलिंगच्या दुनियेत आपण आपल्या जवळच्या व्यक्तींना भेटावे, मनमोकळे बोलावे, गप्पा मारत एकमेकांसोबत वेळ घालवावा या उद्देशाने लांडोर बंगला परिसरात स्नेहमिलन आणि वनभोजनाचा कार्यक्रम बुधवार दि. २ ऑगस्ट रोजी पार पडला. आझाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद साहेबराव लोंढे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक शंकर खरात, समता समाज संघाचे जिल्हाध्यक्ष किरण गायकवाड यांनी मनस्वी इच्छेतून या स्नेहमिलन व वनभोजन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना धुळे पोलीस दलाने खूप चांगले सहकार्य केले. या सर्व तणावग्रस्त परिस्थितीत पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, उपअधीक्षक रुषीकेश रेड्डी व वरिष्ठ पोलीस अधिकारींचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस दलाने कोणतेही अनुचित प्रकार घडू न देता परिस्थितीवर बारीक लक्ष देवून नियंत्रण ठेवले. . याबद्दल पोलीस दलाचे आभार मानण्यासाठी पोलीस अधिकारीवर्गाला या स्नेहमिलन सोहळ्याला विशेष आमंत्रित करण्यात आले होते. तसेच दलित, पुरोगामी चळवळीत सक्रीय असलेल्या विविध दलित पक्ष, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर तसेच काही पत्रकार मित्रांनाही या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले होते. या सर्वांनी स्नेहमिलन सोहळ्यात हजेरी लावून एकमेकांच्या भेटीगाठी घेत, गप्पा रंगवित वनभोजनाचा निसर्गानंद घेतला. याप्रसंगी धुळे शहर वाहतूक शाखेचे पी.आय. भूषण कोते, मोहाडी पोलीस ठाण्याचे एपीआय शशिकांत पाटील, धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पी.आय. प्रमोद पाटील, ज्येष्ठ दलित नेते एम. जी. धिवरे, ॲड. विलास झाल्टे, आरपीआय आठवले गटाचे नेते शशिकांत वाघ, माजी उपमहापौर नागसेन बोरसे, माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ, दलित नेते श्रावण खैरनार, प्रभाकर जाधव, बौध्दाचार्य सुरेश लोंढे, महिला नेत्या नयना दामोदर, राष्ट्रवादीच्या सरोज कदम, संगिता खैरनार, मंगला मोरे, अंजुताई चव्हाण, महेंद्र शिरसाठ, वचितचे जिल्हाध्यक्ष अरविंद निकम, युवानेते मुकेश खरात, चंद्रकांत सत्तेसा, विशाल पगारे, दिनेश निकुंभे, मनीबाबा खैरनार, डॉ. भूषण पाटील, आबा खंडारे, राजूबाबा शिरसाठ, बापूसाहेब बाविस्कर, संजय जवरास, अमोल शिरसाठ, आबासाहेब अमृतसागर, रामकृष्ण नेरकर, गौतम पगारे, विनोद केदार, पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष सुकलाल बैसाणे, अनिल ठाकूर, पत्रकार रवि नगराळे, सचिन बागुल, सुनील बैसाणे, सनी सोनवणे, नागिंद मोरे, रवि कढरे, किशोर पाटील, महेंद्रसिंग राजपूत यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



# संभाजी भिडेंवर कारवाई करा: सावता परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** राष्ट्रपिता महात्मा गांधी, थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्यासह अनेक महापुरुषांबद्दल सतत वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या मनोहर भिडे यांच्यावर शासनाने गुन्हा दाखल करून तातडीने कायदेशीर कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा सावता परिषदेच्या वतीने कळंबोली येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप गुजर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सावता परिषद नवी मुंबई जिल्हाध्यक्ष उद्धव भुजबळ, पनवेल तालुका अध्यक्ष जयराम डोके, कळंबोली उपाध्यक्ष लहू मलकमिर, नितीन जाधव, समाजसेविका संगीता राऊत, नवनाथ घनवट, महेश कुमार राऊत, पत्रकार हेमंत धायगुडे आदी उपस्थित होते. भुजबळ यांनी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, संभाजी भिडे हे थोर व्यक्ती संदर्भात वारंवार वादग्रस्त वक्तव्य करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. नुकतेच त्यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्याबाबत बेताल वक्तव्य केले असून त्यामुळे जनमानसात सामाजिक तेढ निर्माण केला आहे. संभाजी भिडे जाणून बुजून शांततामय महाराष्ट्रात दंगली कशा उसळतील, या हेतूने वारंवार महातम्यांचा अवमान करीत आहेत. तरी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विषयी अनेक बेताल वक्तव्य केलेली आहेत. अशा विकृत मनोवृत्ती व महाराष्ट्र पेटवणाऱ्यांचा आम्ही निषेध करीत आहे.

# जिंतूर न.प. अधिकाऱ्यांकडून माहिती देण्यासाठी कर्मचाऱ्यांस लाचेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** न.प. मधील अनागोंदी कारभाराने कळस गाठला असून आता तर चक्क कार्यालयीन कर्मचाऱ्याकडूनच वरिष्ठांकडून लाचेची मागणी होत असल्याचे निवेदन आयुक्त न. पालीका प्रसासनाकडे केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त आसी की जिंतूर नगर परिषद कर्मचारी गुलाब साबळे यांनी न.पा.च्या रिव्हीजन घर नंबर 752 ची साक्षांकित प्रती, साल 2005 ते2006, चा रिविजन फॉर्म, बेटमेंट चार्जेस भरणा करून घेण्यासंदर्भात ठराव, दिनांक 31/03/ 2012 रोजी बेटंमेट चार्जेस भरणा करून घेतलेली संपूर्ण संचिका व दिनांक 26/0 4/ 2023 रोजी नगर परिषदेने मा. जिल्हाधिकारी यांना पाठवलेला अहवाल देण्यात यावा अशी मागणी मुख्याधिकारी जिंतूर यांना केली असता माझ्या कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षक आर.बी. चव्हाण यांनी 20,000 /- रुपयाची लाचेची मागणी केली असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच निवेदनात पुढे म्हटले आहे की मी पैसे देण्यास असमर्थता दर्शवली असल्यामुळे त्यांनी सदरील संदर्भीय प्रकरणात मी मागणी केलेल्या साक्षांकित कागदपत्राची माहिती तर दिली नाही उलट मलाच दोषी म्हणून सविस्तर26/04/ 2023 रोजी जिंतूर नगरपरिषदेने माननीय जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवलेल्या अहवालानुसार सदरील प्रकरणात मला दोषी ठेवण्यात आले आहे असा आरोप ही निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की सदरील प्रकरणात पाच ते सात कर्मचाऱ्यांचा सहभाग होता त्यांना केवळ नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला पण मला सदरील प्रकरणात नोटीस किंवा तोंडी सूचना दिलेली नसून तरी मला एकट्यालाच दोषी ठरवण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदरील प्रकरणामधे मुख्याधिकारी यांनी मागीतलेली माहिती द्यावी असे तोंडी सांगितल्याचे साबळे यांनी आमच्या प्रतिनिधीस सांगितले. मला मानसिक व शारीरिक त्रास निर्माण झाल्यामुळे त्यासाठी लाच मागणारे संबंधित कार्यालयीन अधीक्षक आर .बी. चव्हाण हेच जबाबदार राहतील अशीही निवेदनात म्हटले आहे.

वारंवार मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन देखील मला कार्यालयीन अधीक्षकांच्या पैशाच्या मागणीमुळे मला अद्याप पर्यंत मी मागवलेली माहीती प्राप्त झालेले नाही, अशी ही वरिष्ठांना पाठवलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# सुविधा देण्याचे काम आमचे कार्यालय करेल : रुपाली यादव



आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरुणांना शासकीय पातळीवर अनेक प्रमाणपत्रांची गरज असते, ही गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र शासन शासकीय पातळीवरती अनेक उपक्रम राबवित आहे. त्याचाच एक भाग म्हणून युवा संवाद हा उपक्रम राबवित आहोत. ज्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारची प्रमाणपत्रे त्यात जात प्रमाणपत्र, क्रिमिलियर, उत्पनाचा दाखला, महसूल विभागाच्या विविध योजना, पीक पाणी, मतदार नोंदणी यासारख्या अनेक सुविधा व प्रमाणपत्रे तत्परपणे देण्याचे काम आमचे कार्यालय करेल. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक असते, असे प्रतिपादन खंडाळा तालुका तहसील कार्यालय मंडल अधिकारी श्रीमती रुपाली यादव यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद येथे महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व तहसील कार्यालय खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने महसूल सप्ताह निमित्त युवा संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते. यावेळी व्यासपीठावरती लोणंदचे तलाठी एस.बी.वणवे, कला विभागाचे उपप्राचार्य प्रा. भीमराव काकडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.एम.डी.नायकू आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी एस.बी.वणवे यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना व समस्यांना उत्तरे देताना तहसील कार्यालयातील अडचणी सोडवण्याचे आश्वासन आपल्या मार्गदर्शनातून दिले. या युवा संवादाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.एम.डी.नायकू यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. सुभाष कदम, लोणंदचे कोतवाल विठ्ठल कुंभार महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मान्यवरांचे आभार प्रा.भीमराव काकडे यांनी मानले.



# विश्वकल्याणासाठी सारसबाग गणपती मंदिरात विष्णूयाग व विष्णुसहस्त्रनाम पठण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** विश्व कल्याणाकरिता, समाजाच्या उत्तम आरोग्याकरीता गीता फाउंडेशन मिरज अंतर्गत पुणे श्रीनिवास ग्रुपच्यावतीने अधिक मास निमित्त विष्णू यागाचे आयोजन करण्यात आले. विविध प्रकारच्या धार्मिक विधींनी यज्ञाला प्रारंभ झाला. तब्बल सातशे भाविक सहभागी होत यावेळी विष्णू सहस्त्रनामाचे पठण करण्यात आले. सारसबागेतील गणपती मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पुण्यातील श्रीनिवास ग्रुपच्या विद्या बेळंबे, सुमित्रा चव्हाण, श्रद्धा देवकर, शैलजा मोरे, वंदना साठे, उज्वल धर्माधिकारी व इतर सहकारी उपस्थित होते. सलग सहा तास याग सुरू होता. गणपती मंदिरातील मंडपात होमकुंड साकारण्यात आले होते. भगवान विष्णू हे विश्वाचे पालनकर्ता म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांची उपासना करून जगाच्या कल्याणा करिता व समाजाचे आरोग्या चांगले राहण्यासाठी प्रार्थना करण्यात आली. तसेच भगवान विष्णूंच्या नामाचा जप करण्यासाठी हजारो भाविक सहभागी झाले होते. यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.




# पोनि राजेंद्र टाकणे यांच्या टीमची दमदार कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज





**माळशिरस :** शाळांच्या परिसरात १०० मीटर अंतरावर सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने कायदा २००३ अंतर्गत (कोप्टा) बंदी आहे. तरीसुद्धा शाळांबाहेर खुलेआम मावा, गुटखा विक्री होते.त्यासंदर्भात सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या आदेशानुसार कालपासून जिल्हाभर विशेष मोहीम राबवून टपरी चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कोप्टा कायद्यानुसार सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिरातींना प्रतिबंध घालण्यात आला आहे. तसेच व्यापार, वाणिज्य,नियमन आणि उत्पादन व पुरवठा, वितरणावर देखील बंदी घालण्यात आली आहे. विशेषतः शाळांमधील मुलांना व्यसनाची सवय लागू नये या हेतूने शाळांच्या १०० मीटर अंतरात अशा पदार्थांची विक्री करणे गुन्हा आहे.आता शाळा परिसरासह प्रत्येक पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील पानटपऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.याच अनुषंगाने माळशिरस तालुक्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिलीव औट पोस्टच्या हद्दीतील गुटखा विक्री करणार्या टपर्यांवर धाडी टाकून एका दिवसात तब्बल एकुण २० टपरी चालकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सई भोरे-पाटील, माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिलीव औट पोस्टचे पोउनि एम.एम पुजारी, अभिजीत कणसे, पंडीत मिसाळ, अमित जाधव, दत्ता खरात, सतीश धुमाळ यांनी केली. या कामगिरीबद्दल पिलीव औट पोस्टच्या सर्व कर्मचाऱ्यांचे पोनि राजेंद्र टाकणे यांनी कौतुक करुन अभिनंदन केले असून गुटखा विक्रित्यांना गुटखा विक्री बंद करण्याची तंबी दिली आहे.

## कवितेतला रंगभान असणारा कवी हरपला

आधुनिक केसरी न्यूज

आदरांजली ना. धो. महानोर.
भरलं आभाळ पावसाळी पाहुणा गं..
बाई, श्रावणाचं ऊन मला झेपेना!
हे बोलं होते ना रे तुझेचं... ?
विरुनी जाऊ नये अगदी असेचं!
महानोर तू कोठे बरे हरपला ?
बघं कसे ऊन ही संपले....
अन् पाऊस ही थांबला!
बहर काव्याचा कसा ओसरला ?
जाण्याने तुझ्या जीवं हा थरथरला!
श्रावणाचं ऊन देखील नाही झेपले तुला
जाण्यासाठी नेमका श्रावणचं तू निवडला!
असा कसा सांग श्रावणी मुहूर्त तू साधला!
गच्च भरुनी आले रे आभाळ...!
बोल तुझे ऐकीवं पुन्हा मधाळ!
परत फिरुनी तू येऊनी गाऊनी जा, ना....!
भरलं आभाळ पावसाळी पाहुणा गं..
बाई, श्रावणाचं ऊन मला झेपेना!
दुःख तुझ्या जाण्याचे....
आम्हाला ही सोसवेना !

*कवियत्री विजया जक्कल*



# महाविकास आघाडीच्या वतीने अण्णा भाऊ साठे जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** 1 ऑगस्ट रोजी सकाळी 10.00 वाजता मुकुंदवाडी येथील साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील, काँग्रेस पक्षाचे मा.आ.कल्याण काळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर व देशातील मणीपूर सारख्या घटनांबाबत केंद्र सरकारच्या मनमानी धोरणांची मान्यवरांनी उपस्थितांना माहिती दिली.

यावेळी मोतीलाल जगताप, भास्कर लहाने, दिपक म्हस्के, दशरथ मानवतकर, अशोक डोळस, भाऊसाहेब जगताप, गंगाराम कापसे, सुभाष पांडभरे, संदिपान काळे, जगदेव म्हस्के, नामदेव गायकवाड, बाबुराव थोरात, शाम तुपे, मल्हारी डोणगावकर, दिलीप खरात, रामभाऊ निकाळजे, लक्ष्मण टोम्पे, पंडित आंबेकर, अंकुश चौधरी, सुभाष शुक्ला, शिवाजी काळे, भिमराव शेजुळ, भिमराव आढाव, रावसाहेब गवई यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पंढरीनाथ खंदारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभय मानवतकर, अतुल खांडगावकर, फुलचंद जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार आक्रूर वाघ यांनी मानले.

## नितीन काकडे यांना कृषिभूषण पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**शेवगाव :** बोधगाव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य तथा गावचे उपसरपंच नितीन काकडे यांना नुकताच राज्यस्तरीय " कृषिभूषण " पुरस्कार जाहीर झाला असून काकडे यांनी आरोग्यदायी दुधाबरोबर मुक्त गोठ्यातील शेणखताच्या माध्यमातुन शेतीचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न करत त्यांनी गेल्या काही वर्षांपासून गीर गायी संगोपनाचा यशस्वी प्रयोग केला असून हा पुरस्कार वृंदावन फाऊंडेशन व राजमुद्रा संशोधन आणि विकास केंद्र पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र कृषी दिनानिमित्ताने महाराष्ट्र राज्यातील प्रयोगशिल शेतकरी बांधवांना देण्यात येत असतो.



## नेतृत्व क्षमता हा उत्तम व्यक्ती बनण्याचा मार्ग : डॉ. सुशील कपूर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** प्रत्येकाने आपले काम वेळेवर, नियोजनबद्ध पद्धतीने केले तर ते काम योग्य होते. त्यात १०० टक्के यश मिळते. नेतृत्व क्षमता हा उत्तम व्यक्ती बनण्याचा मार्ग आहे. असे प्रतिपादन मा. प्रा. डॉ. सुशील बी. कपूर (ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव )यांनी केले. कपूर यांनी विद्यार्थ्यांना त्रिसूत्री सांगितली. उत्तम मित्र बनवा, आपले आवडते छंद जोपासा, आणि आई-वडील व शिक्षकांना कधीही विसरू नका.

लोकमान्य टिळक स्मारक मंडळाद्वारे संचालित चारही विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.रवींद्रजी भागवत होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे अनेक मोह आहेत. आपण या मोहांपासून दूर राहिले पाहिजे. थोर पुरुषांची जयंती पुण्यतिथी साजरी करण्यामागे हेही कारण आहे की, त्यांच्या चरित्रातून आपल्याला स्फूर्ती मिळते व आपले ध्येय निश्चित करून त्या दिशेने वाटचाल करताना मोहाकडे आपल्याला दुर्लक्ष करता येते. याप्रसंगी तीनही शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच ROLE म्हणजे 'द रिसर्च ऑर्गनायझेशन फॉर लिव्हिंग एनहान्समेंट या संस्थेचे अध्यक्ष श्री. धीरज उपाख्य रमेशभाई पटेल यांनी संस्थेतर्फे वीस गरजू विद्यार्थ्यांना सायकली दिल्या. विद्यार्थी विकास निधीतून वर्ग पाचवीच्या 75 विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आले. या पुण्यतिथी कार्यक्रमात व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष प्रमुख अतिथी तसेच मंडळाचे उपाध्यक्ष ॲड.श्री प्रशांतजी घट्टूवार, सचिव श्री. गांगेय सराफ विराजमान होते. या कार्यक्रमास मंडळाचे सहसचिव डॉ. राम भारत कोषाध्यक्ष अरुणजी मदनकार, कार्यकारणी सदस्य श्री दत्तप्रसन्न महादानी, डॉ.प्रवीण पंत ॲड. अभयजी पाचपोर ,श्री. श्रीपादजी मुनगंटीवार, सभासद सौ. वनमाला धानोरकर, माजी मुख्याध्यापिका सौ. जया भारत, सौ मंगला श्रीरामे ,माजी मुख्याध्यापक श्री नीलकंठ कावडकर, वसंतजी थोटे, श्री राजनहिरे सर उपस्थित होते. तसेच तिन्ही विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव श्री गांगेय सराफ यांनी तिन्ही शाळांच्या शैक्षणिक सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील प्रगतीचा अहवाल सादर केला व लोकमान्य टिळकांचे जहाल मतवादी विचार आपल्या बुलंद आवाजात कवितेतून सादर केले. तर उपाध्यक्ष श्री. प्रशांतजी घट्टूवार यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अकरावी कला शाखेची विद्यार्थी कू. सेजल बोबडे हिने केले. कार्यक्रमाचा समारोप वर्ग नववीचा विद्यार्थी मंथन कोठेवार ह्याने गायलेल्या पसायदानाने झाला.

## जिंतूर शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. सुनील बुधवंत यांनी घेतला नगरपालिकेच्या कामांचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. सुनिल शिवाजीराव बुधवंत यांनी दि. 03 ऑगस्ट, गुरुवार रोजी जिंतूर नगरपालिकेला भेट देऊन विविध कामांचा तसेच व्यवस्थापनाचा आढावा घेतला.

याप्रसंगी त्यांनी पावसाळ्यातील संभाव्य धोके लक्षात घेऊन उपाययोजना तयार ठेवण्याचे निर्देश कार्यालय अधीक्षक चव्हाण यांना दिले. शहर पाणीपुरवठा योजना, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची सद्यस्थिती तसेच कचरा उचलणे बाबतची घंटागाडी यासंदर्भात नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन उचित उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्याबरोबरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे साहेबांचा आरोग्य व्यवस्थेतील अत्यावश्यक प्रकल्प 'आपला दवाखाना' सुरू करण्यासाठी आरोग्य अधिकाऱ्यांना सोबत घेऊन प्रशासनाशी पत्रव्यवहार करून 'आपला दवाखाना' सुरू करण्याच्या कामात गती आणण्याच्या सूचना दिल्या. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. सुनिल शिवाजीराव बुधवंत यांच्या सोबतच शिवसेनेचे तालुका सचिव अशोक मधुकरराव देशमुख यांची उपस्थिती होती.



# सोयगाव पंचायत समितीचा अजब कारभार रामभरोसे

## कामे खोळंबली : मा.सभापती चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथे पंचायत समितीला गेल्या वीस दिवसापासून तत्कालीन गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांची बदली झालेली आहे. परंतु अद्यापही सोयगाव पंचायत समितीला नवीन गटविकास अधिकारी देण्यात आलेला नसल्याने येथील कारभार सध्या रामभरोसे चालू नागरिक हैराण झाले आहे आम्हाला तातडीने सोयगाव पंचायत समितीला गटविकास अधिकारी द्यावे अशी मागणी अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्या कडे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे.नागरिकांची कामे खोळंबल्याने येथे लवकर नवीन बिडिओची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी मा.सभापती चव्हाण यांनी केली आहे.

तत्कालीन गटविकास अधिकारी नाईक यांच्या जागेवर जिल्हा परिषदेने नवीन गटविकास अधिकारी न दिल्याने नाईक हे पदभार न देताच खुलताबादला रुजू झाले आहे. त्यामुळे सोयगावचा पदभार त्यांच्याकडेच आहे. त्यामुळे खुलताबादवरून सोयगाव पंचायत समितीच्या कारभाराचा गाडा हाकण्यात येत आहे.

काही महत्त्वाच्या कामांसाठी सोयगाव पंचायत समितीची कागदपत्रे घेऊन खुलताबादला स्वाक्षरी साठी जावे लागत असल्याचे चित्र समोर येत आहे.सोयगाव तालुका अति दुर्गम असल्याने आणि मागासलेल्या तालुक्याला गटविकास अधिकारी नाही. याची मोठी खंत आहे. त्यामुळे ग्रामीण विकास खोळंबा झाला आहे. घरकुल योजना, बळिराजा सर्वेक्षण,गायगोठे,जल जीवन मिशन, रोहयो संचिका आदी कामे जवळपास ठप्प झाली आहे. ग्रामपंचायतीचे कामेही होत नसल्याने कर्मचाऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. सोयगावसाठी चौघांची नावे चर्चेत सोयगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदासाठी प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेत संजय गायकवाड, दादाराव अहिरे, दीपक म्हेत्रे आणि संतोष भालेराव या चौघांची प्रभारी गटविकास अधिकारी साठी नावे चर्चेत आहे.परंतु त्यापैकी गायकवाड यांनी स्पष्टपणे नकार दिलेला असून अहिरे यांची संचिका सध्या स्वाक्षरीसाठी पुढे आलेली आहे.त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याआधी पुन्हा प्रकल्प अधिकारी म्हेत्रे, कृषी विस्तार अधिकारी भालेराव यांची नावे पुढे आली आहे. त्यामुळे चौघांपैकी सोयगावसाठी कुणाच्या गळ्यात माळ पडते हे कधी कळणार नागरिकांच्या नजरा लागल्या आहेत. तातडीने गटविकास अधिकारी देण्यात यावा अशी मागणी माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे.

# शैक्षणिक साहित्य व गणवेश ठराविक विक्रेत्याकडून खरेदी करण्याची सक्ती

## ज्ञानदीप शाळेवर कारवाई करा : मनीष नरवडे जिल्हाध्यक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शालेय साहित्य काही ठरावीक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्यात यावे, असे सांगून काही शाळा पालकांवर दबाव आणत आहेत. तसाच एक प्रकार ज्ञानदीप इंग्लिश हायस्कूल दौलताबाद ता.जि. औरंगाबाद या शाळेत घडला आहे. शहरातील सर्व शाळांची तपासणी करून शासन निर्णय ( २००४०७२६१३२८१२००१-०५०० ११ जून २००४ ) न पाळणाऱ्या शाळांवर शासन निर्णयानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( खरात ) पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे शिक्षण अधिकारी यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी शिक्षण विभागाचे शिक्षण अधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांना निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, कोरोनाकाळात बंद असलेल्या शाळा दोन वर्षांनंतर पुन्हा सुरू झाल्या आहेत दिनांक १४ जून पासून बहुतेक शाळा सुरू झाल्या असल्याने पाल्य उत्साहात आणि पालक शालेय साहित्याच्या खरेदीत व्यग्र आहेत. मात्र, अनेक खासगी शाळांनी पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक साहित्य शाळेने सांगितलेल्या ठरावीक दुकानांतूनच खरेदी करावे, अशी सक्ती केली आहे. तसेच भरमसाठ फी वाढ केली आहे. दुसरीकडे हेच साहित्य वाजवी दरात मिळत असताना शाळेचा विशिष्ट दुकानांसाठी आग्रह का, असा सवाल पालक करीत आहेत. कोरोनाकाळात ढासळलेल्या आर्थिक स्थितीमुळे अनेक पालकांना हा अधिकचा खर्च सोसणे कठीण होत आहे.कोरोनाकाळात अनेक शाळांनी स्वतःचा वेगळा अभ्यासक्रम सुरू केला असल्याने एखाद्या विशिष्ट प्रकाशनाचीच पाठ्यपुस्तके आणि साहित्याची गरज निर्माण केली आहे. यामुळे शाळा, शैक्षणिक साहित्य विक्रेते आणि प्रकाशने यांचे साटेलोटे तर नाही ना असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच शाळांनी दिलेल्या पास किंवा चिट्टी नुसार त्या दुकानात गेल्यावर पाठ्य पुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तकांचा एक संपूर्ण संच देतात. त्यातील अनेक पुस्तकांची गरजही नाही असे प्रत्यक्षात पाहिले असता जाणवते पण नाईलाज असल्यामुळे पालकांना त्यांची खरेदी करावी लागते. शाळांनी ठरवून दिलेले विक्रेते बाजारभावापेक्षा जास्त दर आकारतात, तसेच शाळा व विक्रेते यांच्यात काही करार किंवा टक्केवारी ठरली असल्याने शाळा ही अधिकाधिक नफा मिळण्यासाठी तेथूनच खरेदी करण्याच्या सक्तीचे आदेश काढल्याने पालकांचा नाइलाज होतो. अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळा यात अग्रेसर आहेत. शाळांना अशी सक्ती करता येऊ शकत नाही. पुस्तके कुठून घ्यावीत, हा पालकांचा प्रश्न आहे. शाळेने अशी सक्ती केल्यास पालकांनी आमच्याकडे तक्रारी कराव्या असा शिक्षण विभाग यांचा आदेश आहे पण आपल्या पाल्याच्या शैक्षणिक भविष्याचा विचार करून पालक तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ करतात. पालकांची शैक्षणीक साहित्याच्या नावाखाली लूट करून पालकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यासाठी औरंगाबाद शहरातील सर्व अनुदानित विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, सीबीएससी, आयसीएससी अशा सर्व शाळांची तपासणी करावी. तसेच कोणत्या शाळेत जर अशा प्रकारचे गैरकारभार तसेच शासन आदेशाचे पालन होत नसेल, तर अशा शाळांवर कारवाई करण्यात यावी, तसेच ज्ञानदीप शाळा ही शैक्षणिक साहित्य ठराविक विक्रेत्याकडून खरेदी करण्यासाठी सक्ती करत असल्याने त्या शाळेवर सुद्धा कारवाई करावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( खरात ) पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

> शासन निर्णय २००४ नुसार कोणत्याही शाळेला एखाद्या विशिष्ट, ठरावीक विक्रेत्याकडून शैक्षणिक साहित्य खरेदी करा, अशी सक्ती पालकांवर करता येत नाही . परंतु शाळा व्यवस्थापनाने हे नियम धाब्यावर बसविले आहेत . सर्व खासगी शाळांत सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत अनेक गरीब मुले दाखल होतात . त्यांना केवळ शैक्षणिक शुल्क माफ केले जाते . पण पुस्तके आणि शाळेचे इतर साहित्य खरेदीसाठी सक्ती केल्याने मुलांच्या पालकांवर मोठे आर्थिक संकट ओढवते .सध्या अनेक पालकांची आर्थिक परिस्थिती कठीण असल्याने अनेक पालक कर्ज काढून, वस्तू गहाण ठेवून, उधार उसनवारीवर पैसे घेऊन हे शैक्षणिक साहित्य खरेदी करत आहेत .

# मनपातर्फे मेरी मिट्टी मेरा देश अभियान



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केंद्र सरकारच्या निर्देशानुसार स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने हुतात्म्यांच्या स्मरणार्थ ' मेरी मिट्टी मेरा देश अभियान चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणार आहे. सदरउपक्रमाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी आढावा बैठक २ ऑगस्ट रोजी अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मनपा सभागृहात घेण्यात आली.

आझादी का अमृतमहोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमाबाबत संपुर्ण देशात व राज्यात मेरी माटी मेरा देश ( मिट्टी को नमन विरों को वंदन ) अभियान दि.९ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२३ दरम्यान राबविले जाणार आहे. नागरिकांत आपली मातीविषयी जनजागृती प्रेम व साक्षरता निर्माण व्हावी व या मातृभूमीसाठी झटणारे तसेच त्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीरांच्या सन्मान व्हावा या यामागील उद्देश आहे. या अभियाअंतर्गत शहरातील सर्व नागरिकांना स्वयंस्फूर्तीने हातात मातीचे दिवे अथवा माती घेऊन पंचप्रण शपथ घ्यायची असुन सदर सेल्फी merimaatimeradesh.gov.in या पोर्टलवर अपलोड करावयाची आहे. वीर सैनिकांच्या स्मृतीप्रित्यर्थ अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून मनपा क्षेत्रात विशेष शिलालेख बसविण्यात येणार आहे.या शिलालेखावर देशासाठी,स्वातंत्र्यासाठी व सुरक्षेसाठी बलिदान दिले अश्या थोर व्यक्तींची नावे कोरण्यात येणार आहे. योग्य जागा निश्चित करून स्वदेशी ७५ रोपट्यांची लागवड करून अमृतवाटिका तयार करण्यात येणार आहे. संरक्षण दल,निमसंरक्षण दल,पोलीस दलातील शहीदांचा व स्वातंत्र्य सैनिकांच्या परिवारातील सदस्यांचा कार्यक्रमप्रसंगी सत्कार करण्यात येणार आहे. प्रत्येक गावातील, शहरातील माती जमा करून तो कलश दिल्ली येथे पाठविला जाणार आहे. दिल्लीत राष्ट्रीय युद्ध स्मारकाजवळ अमृत वाटिका तयार करण्यात येणार असून त्यामध्ये देशभरातून आणलेली माती आणि लहान रोपे वापरली जातील. स्वातंत्र्यदिनी देशभरात यावर्षीही प्रत्येक घराघरात तिरंगा फडकविला जाणार असुन सदर कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. याप्रसंगी उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त अशोक गराटे,शहर अभियंता महेश बारई,उपअभियंता अनिल घुमडे,सहायक आयुक्त सचिन माकोडे,राहुल पंचबुद्धे, नरेंद्र बोभाटे तसेच सर्व विभागप्रमुख यांची उपस्थिती होती.



# काकासाहेब देशमुख विद्यालयाची विद्यार्थिनी रोहिणी पवार एमपीएससीत मुलींमध्ये तिसरी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी रोहिणी किसनराव पवार हिने एमपीएससी परीक्षेत नेत्र दीपक यश मिळवले असून मंत्रालयीन क्लर्क परीक्षेत महाराष्ट्र राज्यातून तिसरा व मुलींमध्ये पहिला क्रमांक आणि कर सहाय्यक परीक्षेमध्ये राज्यातून मुलींमध्ये तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होत दुहेरी यश मिळवले आहे तिच्या या यशाबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

रोहिणी पवार हिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात झाले असून विद्यालयाचे आदर्श संस्कार व शिकवण आई वडील व गुरुजनांच्या मार्गदर्शनामुळेच मला हे यश मिळाले असून कर सहाय्यक या पदावर कार्य करण्याचा तिने निर्णय घेतला आहे.

यावेळी रोहिणीने माझ्याप्रमाणे प्रशासकीय सेवेमध्ये मुलींनी सुद्धा पुढे येऊन जिद्द चिकाटी कठोर मेहनतीने उज्वल यश प्राप्त होऊ शकते हे सिद्ध करून दाखवावे असे मत व्यक्त केले.

कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयाची यापूर्वीसुद्धा एमपीएससी परीक्षेत उपजिल्हाधिकारी पोलीस उपनिरीक्षक मुख्य कार्यकारी अधिकारी सहाय्यक कर अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग व मंत्रालयीन स्तरावर अनेक विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले याबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षा श्रीमती ताराबाई कृष्णराव जाधव यांनी अभिनंदन केले यावेळी मुख्याध्यापक आबासाहेब चव्हाण, पर्यवेक्षक , रावसाहेब निकम, वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव, प्रदीप सनंसे, सचिन भामरे ,जगमोहन मुंडवाडकर, देवेंद्र राजपूत सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थित होते .

# ९५ टक्के शहरात अमृतचा पाणीपुरवठा

## आ. अडबाले यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** चंद्रपूर शहरासाठी अमृत पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. मात्र, या योजनेचा शहरातील अनेक प्रभागात पाणीपुरवठा होत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांनी अमृत पाणीपुरवठा योजनेबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, अमृत योजनेचे भौतिकदृष्ट्या ९५ टक्के काम पूर्ण झाले असून, शहरातील ९५ टक्के भागात पाणीपुरवठा होत असल्याची माहिती दिली आहे. चंद्रपूर शहराला अनेकवर्षे जुन्या योजनेतून पाणीपुरवठा केला जात होता. मागील काही वर्षांत शहराचा मोठा विस्तार झाला आहे. त्यामुळे जुन्या योजनेतून अर्ध्या शहराला पाणीपुरवठा होत नव्हता. नागरिकांना बोअरवेल, विहिरीवर अवलंबून रहावे लागत होते. त्यामुळे केंद्र सरकारच्या अमृत योजनेत चंद्रपूर शहर समाविष्ट करण्यात आले. केंद्र सरकार, राज्य शासन आणि महानगरपालिका यांच्या माध्यमातून या कोट्यवधी रुपयांच्या योजनेला सुरवात झाली. अनेक वर्षांची पाणी समस्या कायमची निकाली निघेल, असे चंद्रपूरकरांना वाटत होते. परंतु, निर्धारित कालावधी लोटूनही योजना पूर्ण करण्यात आली नाही. त्यामुळे महानगरपालिकेने संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई केली आहे. शहरातील काही प्रभागात या योजनेचा प्रारंभ करून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. मात्र, आजही अनेक प्रभागात या योजनेद्वारे पाणीपुरवठा केला जात नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांनी पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेत अमृत पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रश्नाला उत्तर देताना चंद्रपूर शहरातील १५ झोनमधील भागात पाईप लाईनने पाणीपुरवठा केला जात आहे. शहरास एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. विविध विभागाकडून परवानगी, कोविडमुळे योजनेच्या कामाच्या गतीवर परिणाम झाला आहे. अमृत योजनेचे भौतिकदृष्ट्या ९५ टक्के काम पूर्ण झाले आहेत. प्रकल्प पूर्ण करण्याचे काम वेगाने सुरू असून, योजना सुरू करण्यासाठी झोननिहाय चाचणी घेण्यात येत आहे. सद्यस्थितीत या योजनेतून शहरातील ९५ टक्के भागात पाणीपुरवठा सुरू असून, उर्वरित कामे लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन महानगरपालिका करीत असल्याचे सांगितले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# कपाशी पिकावर मर रोगाचे प्रमाण वाढले

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यात फुलंब्री तालुक्यात एकुण ५७५१५ हेक्टर क्षेत्रापैकी २५२९१ हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड करण्यात आली आहे. यात तालुक्यात आतापर्यंत भिजपाऊस पडलेला असून बर्याच शेतकऱ्यांच्या शेत जमीनीवर पावसाचे पाणी तुंबल्याचे दिसून येत आहे. अशामुळे बर्याच शेतकऱ्यांच्या शेतातील कापसावर मुळकुज रोगाचे प्रमाण वाढल्याची अशी माहिती फुलंब्री तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी दैनिक लोकरत्न या प्रतिनिधीना दिली. तसेच पुढे म्हणाले की, मुळकुज हा रोग कापसावर आल्याने कापसाचे झाड शेंड्यापासुन कोमेजून खाली पडत आहे.

रोगग्रस्त झाडे जमीनीतुन सहज उपटली जात आहे. झाडाची मुळे तांबडी किंवा काळी पडुन कोरडी दिसतात. झाडाच्या बुंध्याशी पांढर्या रंगाच्या बुरशीची वाढ दिसून येत आहे. रोगाचे एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे आवश्यक असुन शेतकऱ्यांनी कापूस पिकावर नत्रयुक्त खतांचा वापर करणे टाळावे. मागील हंगामात मुळकुजचा प्रादुर्भाव आढळून आले तर कापूस लावणे टाळावे. पिक काढून झाल्यानंतर कपाशीची झाडे व अवशेष ट्रॅक्टर चालित मोबाईल श्रेडरने बारीक कुट्टी करून त्यावर ट्रआयकओडर्मआ भुकटीची फवारणी करावी. शेतामध्ये वाफसा असल्यास सिंचन करावे. रोगग्रस्त रोपटे उपटून टाकावे, सद्यस्थिती प्रादुर्भाव आढळून आल्यास कार्बेडाझीम ५०% १२ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा ट्रायकोडर्मा १% ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात याप्रमाणे रोपाभवती आळवणी करावी. असे आवाहन तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी सर्व शेतकऱ्यांना केले आहे.

फुलंब्री तालुक्यात मर रोगाचे प्रमाण कापसात आढळल्याने गेवराई गुंगी शिवारात तालुका कृषी अधिकारी भारत कासार व कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ आशिष बागडे यांच्यासह मंडळ कृषी अधिकारी निवृतीजोरी यांनी शिवारात भेटी देऊन शेतकऱ्यांना उपायोजना सांगताना माहिती देताना दिसत आहे.

# पुणे- मुंबई मार्गावर दोन ट्रकचा भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मुंबई द्रुतगतीमार्गावरील बोरघाटात भरधाव ट्रक वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने समोरील ट्रकला भीषण धडक दिल्याने अपघात झाला. यात पाठीमागील ट्रक पलटी होऊन तीन जण जखमी झाले. ही घटना पहाटे साडेपाचच्या सुमारास घडली. काच घेऊन जाणारा ट्रक पलटी झाल्याने मुंबईकडे जाणारी जड वाहतूक दोन तासांसाठी बंद करण्यात आली होती. तर हलक्या वाहनांची वाहतूक जुन्या पुणे- मुंबई महामार्गावरून वळवण्यात आली होती. दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, काच घेऊन जाणारा ट्रक पलटी झाल्याने रस्त्यावर काचांचा खच पडल्याचे बघायला मिळाले. पुणे- मुंबई द्रुतगतीमार्गावर बोरघाटात झालेल्या भीषण अपघातात ट्रकचे मोठे नुकसान झाले असून या अपघातात तीन जण जखमी झाले आहेत. अपघात पहाटे साडेपाचच्या सुमारास बोरघाट पोलीस चौकी जवळ झाला आहे. अपघातात ट्रकचा चक्काचूर झाला असून यामुळे मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक दोन तासांसाठी थांबविण्यात आली होती. मुंबई लेनवर काचांचा खच पडला होता. दरम्यान, अथक प्रयत्नानंतर वाहतूक सुरू करण्यात आली आहे. जखमी तीन जणांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचार सुरू आहेत. या अपघातात चालक किरकोळ जखमी झाला आहे.



# रेलगाव येथे अण्णा भाऊ साठे जयंती निमित्त शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील रेलगाव येथे विनोद भाऊ कसारे युवा मंचच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रेलगाव येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक थोरात ग्रामपंचायत सदस्य बिल्डर योगेश पेटारे संदीप पठारे गणेश पठारे विकी शेजवळ अंकुश कोतकर व समाज बांधव उपस्थित होते.

# राष्ट्रीय अवयवदानदिनी निबंध स्पर्धा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** राष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त 3 ऑगस्ट रोजी गोल्डन किड्स इंग्लिश स्कूल येथे निबंध स्पर्धा संपन्न झाली. द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन या संस्थेतर्फे आयोजित या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्र व बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास सामान्य रुग्णालय जालना येथील नेत्रदान समुपदेशक श्रीमती योगिता काकडे, फेडरेशनचे जिल्हा समन्वयक कृष्णा मुजमुले, सामाजिक कार्यकर्ते धनंजय पांगरकर, ओम गायकी, मुकुंद काळे, अनिल काळे, ज्ञानेश्वर काळे, केशव मुजमुले, करण अंबट, अरुण सुरासे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना सुलताने व शिक्षक उपस्थित होते.




# वैजापूरात 'महसूल सप्ताह' अंतर्गत नगर परिषदेच्या वतीने ५०० रोपट्यांची लागवड

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** संपूर्ण राज्यात राजस्व अभियान अंतर्गत महसूल सप्ताह १ऑगस्ट ते७ऑगस्ट पर्यंत सुरू झालेला आहे. या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून जिल्हाधिकारी अस्तिकुमार पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील नगर परिषद व महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार( ता.०३ ) रोजी "माझी वसुंधरा अभियान" व महसूल विभाग च्या वतीने पालिकेच्या व्यंकटेशनगर येथील तारेचे कुंपण लावलेल्या जागेवर पांचशे रोपट्यांची लागवड करण्यात आली. आय.पी. एस. पोलीस अधिकारी महक स्वामी, उपविभागीय दंडाधिकारी तथा उपजिल्हाधिकारी डॉ, अरुण जऱ्हाड, तहसीलदार सुनील सावंत, माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान, मुख्याधिकारी तथा पालिका प्रशासक भागवत बिघोत, माजी नगरसेवक दशरथ बनकर, गणेश खैरे, डॉ. प्रीती भोपळे, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते पाचशे रोपटी लावण्यात येऊन ती जगविण्याचा संकल्प ही सोडण्यात आला. जिल्हाधिकारी अस्तिकुमार पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली मागच्या आठवड्यात दहा हजारांवर झाडे पालिकेच्या जागेवर लावली, आणखी पालिकेच्या जागेवर चाळीस हजार रोपटी लावणार असल्याचे मुख्याधिकारी बिघोत यांनी सांगितले. या प्रसंगी अभियंता सुरेश चिमटे, भांडारपाल वाल्मिक शेटे, चेतन निखाडे, प्रमोद निकाळे, शांताराम मगर, जितेंद्र चापानेरकर, संतोष जाधव, वैजापूर तलाठी एस. पी.जाधव यांच्यासह पालिका व महसूल विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# सरपंचपदी छायाबाई राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यातील अटकळ व दहिद खुर्द या ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी छायाबाई सुरेश राजपूत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. छायाबाई राजपूत यांची बिनविरोध निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला.दहिद खुर्द व अटकळ ग्राम पंचायतीच्या सरपंच यांनी आपसात ठरल्याप्रमाणे आपल्या सरपंच प्रकाश पंजाबराव काळवाघे यांनी पदाचा राजीनामा दिला होता.त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी ग्रामपंचायत अटकळ व दहिद खुर्द ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी छायाबाई सुरेश राजपूत यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा पंचायत समितीचे विस्तार यांनी छायाबाई राजपूत यांची बिनविरोध निवड जाहीर केली.निवड जाहिर होताच गणेश राजपूत व मान्यवर यांनी शाल श्रीफळ देऊन पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत दहिद खुर्द व अटकळ चे ग्रामसेवक, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच पदी निवड जाहीर झाल्या नंतर गावकऱ्यांनी भव्य मिरवणूक काढत राजपूत यांना पुढील आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच छायाबाई राजपूत यांनी दिली आहे. व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा गावकऱ्यांनी दिल्या.



# जिंतूरमधील दहशत पसरविणाऱ्या आरोपीला हद्दपार करा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरात व्यापाऱ्यांना धमकावून पैश्याची मागणी करत दहशत पसरविणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या अनेक गुन्हातील आरोपीला हद्द पार करण्याची मागणी आज आर्य वैश्य कोमटी समाजाच्या व्यापारी बांधवांनी पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात असे म्हटले की, जिंतूर शहरात गेल्या तीन चार महिन्यात आरोपी अभिजित सुभाष राठोड ( उर्फ बिल्ली राठोड ) रा गणपती गल्ली जिंतूर हा अनेक व्यापाऱ्यांना विनाकारण गुंड गिरी करून दहशत पसरविण्याचा उद्देशाने गुंड प्रवृत्तीच्या लोकांना घेऊन शहरात त्रास देत आहे. सदर आरोपीने दिनांक 2/8/2023 रोजी रात्री नगरेश्वर मंदिर जवळ ज्येष्ठ नागरिक नेहमी प्रमाणे बसलेले असताना वरील आरोपीने पैशाची मागणी केलीण् कशाचे पैसे म्हणताच हातातील मोबाईल घेऊन फोडून टाकला व थापड बुक्क्यांनी मारहाण केली आहे. या व्यक्तीने शहरातील अनेक लोकांना त्रास दिला आहे.

या आरोपीला पोलिसांनी काल रात्री पोलीस ठाणे जिंतूर येथे आणून त्यास ताब्यात घेतले तेव्हा पण तो पाहून घेतो असे धमकावत अरेरावी करत होता या गंभीर प्रकार बद्दल पोलिसांनी त्याच्या विरुद्ध फक्त NC दाखल करून तोटकी कार्यवाही केली आहे त्या आरोपी विरुद्ध अनेक गुन्हे दाखल आहेत त्या मुळे सदर व्यक्तीस जिंतूर तालुक्यतून हद्पार करावे ही मागणी केली आहे या निवेदना वर कार्यवाही गतीने करावी आणि कार्यवाही नाही झाल्यास नाईलाजाने आमच्यावर जिंतूर व्यापार बंद ठेऊन आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे निवेदनावर माजी नगराध्यक्ष सखाराम चिद्रवार किरण वट्टमवार चंद्रकांत येरमवार मंदार कोकडवार वैभव वट्टमवार सुनील वट्टमवार यांच्यासह आर्य वैश्य कोमटी समाज व्यापाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थेमध्ये स्वच्छता पंधरवडा साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था (दिव्यांगजन) क्षेत्रीय केंद्र नवी मुंबई संस्थे भारत सरकारला जारी केलेल्या ज्ञापनात दिलेल्या निर्देशानुसार १६ जुलै ते ३१ जुलै २०२३ या कालावधीत राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था (दिव्यांगजन) क्षेत्रीय केंद्र नवी मुंबई संस्थेमध्ये आयोजित स्वच्छता पखवाडा उपक्रम आयोजन केलेले होते.

डॉ. रवि प्रकाश सिंग प्रभारी अधिकारी राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था (दिव्यांगजन) क्षेत्रीय केंद्र नवी मुंबई आणि कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी खालील नमूद केलेल्या उपक्रमात भाग घेतला.

डी व्ही आर बॅच २०२२-२३ चे प्रशिक्षणार्थी शिक्षक आणि विशेष विद्यार्थी २४ जुलै २०२३ (सोमवार) रिसेप्शन एरियामध्ये प्रदर्शित - राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था (दिव्यांगजन) क्षेत्रीय केंद्र नवी मुंबई संस्थेला भेट देणाऱ्या सामान्य लोकांना संवेदनशील करण्यासाठी - कचऱ्यापासून ६ फूट हात धुण्याची बाटली तयार केली. कामाचे ठिकाण – २६ जुलै २०२३ (बुधवार) रोजी आयोजित स्वच्छता मोहीम – कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी आपापल्या मजल्यांची आणि कामाची जागा स्वच्छ करण्यात सहभाग घेतला.

खारघर रेल्वे स्थानकावर जनजागृती आणि स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ३१ जुलै २०२३ (सोमवार) रोजी सकाळी ११.०० ते ११.४५ या वेळेत कर्मचारी, प्रशिक्षणार्थी शिक्षक आणि विशेष विद्यार्थ्यांसह २५ जणांचा गट सहभागी झाला.

खारघर रेल्वे स्थानकावर प्रशिक्षणार्थी शिक्षक व विशेष विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली. प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी ८ मिनिटांचे स्किट सादर केले. हात स्वच्छतेबाबत जनजागृती आयोजन केलेले होते. श्रीमती मानसी नाईक (खारघर रेल्वे स्टेशन मास्टर/इन्चार्ज) आणि स्थानिक जनतेने खूप कौतुक केले.या कार्यक्रमाचे संपूर्ण समन्वयन सुश्री शिल्पी सोनोने व्यवसायोपचार तज्ञ आणि शर्मिष्ठा घोष विशेष शिक्षिका राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था (दिव्यांगजन) क्षेत्रीय केंद्र नवी मुंबई यांनी केले.

## विश्वविख्यात साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** दलित, शोषित, भटके, विमुक्त यांचे जगणे - मरणे साहित्यात मांडून,त्यांच्या शोषणमुक्तीसाठी आपल्या लेखणीला धारधार शस्त्र बनवून लढा देणारे, विश्वविख्यात साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांची १०३ वी जयंती धर्माबाद शहरातील रत्नाळी,बाळापूर, इंदिरानगर,साठे नगर, रामनगर, विविध शासकीय कार्यालय, शाळा आणि महाविद्यालयात मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील अण्णा भाऊ साठे चौक येथून मोटर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत शेकडोच्या संख्येने तरुण लाल ध्वज हातात घेऊन सहभागी झाले होते. यामुळे संपूर्ण शहर गजबजून गेले होते. बाळापूर येथे माचनुरचे उपसरपंच राजेश मनुरे, साहेबराव सोनकांबळे, रामनगर - माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी बी. एम. गोणारकर, डॉ.अण्णा भाऊ साठे मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष एम.जे. पिंगळे, साठेनगर - शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उपजिल्हा प्रमुख गणेश गिरी, लहुजी साळवे चौक - प्रा.डॉ.विजय तूंटे, इंदिरानगर - माजी नगरसेवक संजय पवार, रत्नाळी- माजी नगराध्यक्ष विनायकराव कुलकर्णी व अण्णा अण्णाभाऊ साठे चौक येथे भाजपाचे तालुकाध्यक्ष रवींद्र पोतगंटीवार आदी मान्यवरांच्या हस्ते लाल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. संध्याकाळी या सर्व जयंती मंडळानी आपापल्या भागातून प्रस्थान करत अण्णा भाऊंच्या तैलचित्राची शहरातील मुख्य रस्त्यावरून भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणूकीत सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी हजेरी लावून अण्णा भाऊंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.

कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न उद्भवू नये यासाठी पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सहाय्यक निरीक्षक शंकर महाजन, सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव, पोलीस कर्मचारी संतोष आनेराये,भालेराव, मुंडे, सचिन गडपावार, जोंधळे,माधव पाटील खतगावकर,केंद्र, शिवाजी सूर्यवंशी यांच्यासह मोठा पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

जयंती उत्साहात पार पडावी पण कोणतेही गालबोट लागू नये यासाठी लोकस्वराज्य आंदोलनाचे प्रदेश उपाध्यक्ष व्ही. जी. डोईवाड, बी.एम.गोणारकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष रवींद्र पोतगंटीवार, शिवसेनेचे गणेश गिरी, माजी नगरसेवक संजय पवार, एडवोकेट चक्रेश पाटील,एम. जे. पिंगळे, प्रा. डॉ. विजय तूंटे, राजेश मनुरे, नामदेव सोनकांबळे, पत्रकार सुरेश घाळे, लोकस्वराज्य आंदोलनाचे लक्ष्मण निदानकर, नागोराव कमलाकर, जी. आर. गोणारकर, सत्यनारायण पोवळे, नारायण ईबितवार, प्रकाश भूमकर, प्रवीण गायकवाड, अविनाश पिंगळे, शिवसेनेचे अनिल कमलाकर, दिलीप बोईवार, गिरीश मांजरमकर, जक्कोजी चरके, बळीराम सूर्यवंशी, शेखर कमलाकर, पत्रकार बाबुराव गोणारकर, पत्रकार गणपत जठाळकर, शिवा निदानकर,दत्ताहरी कांचणे,यादव डाकोरे, बालाजी डोईवाड, बालाजी वाघमारे, प्रीतम मंगनाळीकर, शंकर वासनीकर, गंगाधर वासनीकर, कार्यक्रमाला पोलीस पाटील मंगनाळीकर, बि.ए. गोणारकर,बोईवार सर, एच.एम. तलवारे, एन.जी. कमलाकर, जे. के.जोंधळे, गंगाधर जारीकोटकर, नरेश रेड्डी यांनी विशेष काळजी घेतली होती.

या मिरवणुकीत पुरुष - महिला, बालके, तरुण - तरुणी, वृद्ध हजारोच्या संख्येने समुदाय सहभागी झाला होता. काळजी घेतली होती.I मिरवणुकीत पुरुष - महिला, बालके, तरुण - तरुणी, वृद्ध हजारोच्या संख्येने समुदाय सहभागी झाला होता.




## वादग्रस्त विधानांमुळे संभाजी भिडेंविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** महात्मा फुले आणि शिर्डीचे साईबाबा यांच्याविषयी वादग्रस्त विधाने केल्याप्रकरणी संभाजी भिडे यांच्याविरुध्द नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमरावती शहरातील भाषणात भिडे यांनी ही विधाने केली होती. त्यामुळे हा गुन्हा अमरावती शहरातील राजपेठ पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले. याबाबत क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले मंडळाचे अध्यक्ष संतोष गाडेकर यांनी तक्रार दिली होती. भिडे यांच्याकडून महापुरुषांविषयी वारंवार वादग्रस्त विधाने केली जात आहेत. ३० जुलै रोजी भिडे यांनी अमरावती येथील व्याख्यानात त्याची पुनरावृत्ती केली. महात्मा फुले यांच्याविषयी अतिशय हीन दर्जाची भाषा वापरल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

साईबाबा यांच्याविषयी बोलताना त्यांचा धार्मिक भावना दुखावण्याचा उद्देश होता. वादग्रस्त विधानांनी दोन समाजात तेढ निर्माण केल्याप्रकरणी भिडेंविरुध्द गुन्हा दाखल करून कठोर कारवाईची मागणी गाडेकर यांनी केली.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर